# अजिंठा वैभव

(काव्य)

म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. 2284

REFBK-0021485
REFBK-0021485



दिनकर विश्वनाथ कुलकर्णी
B.A.

संदर्भ
२९८८५
१५।२।८८
काव्य

# अजिंठा—वैभव

(काव्य)

वि॰क्र. २२९८
२९८८५
काव्य

प्रति –
मा. ठाणे मराठी ग्रंथसंग्रहालय,
ठाणे
यांना
सप्रेम भेट

30/9/१९८८

REFBK-0021485
REFBK-0021485

कवि दिनकर विश्वनाथ कुलकर्णी B. A.

मुद्रक : जनता प्रिंटिंग प्रेस,
१०८९ शुक्रवार, स्वारगेट चौक पुणे २.

*

प्रकाशिका : सौ. निर्मला दिनकर कुलकर्णी,
'आल्हाद प्रकाशन'
१९/अ, सेनादत्त मंडळ,
सहकारी घरबांधणी संस्था, म. सेनादत्त पेठ, पुणे ४११०३०

*

(सर्व हक्क प्रकाशिकेच्या स्वाधीन)

*

मुखपृष्ठ : श्री. ल. म. कडू, पुणे

*

प्रती : एक हजार फक्त

*

प्रथमावृत्ति

*

प्रकाशन दिनांक : ३० मे १९७६

*

"हा कागद महाराष्ट्र राज्य शिक्षण खात्यातर्फे उपलब्ध झालेल्या सवलतीच्या दरातील आहे."

किंमत : चार रुपये फक्त

" आपल्या कलात्मक कृतीने ज्यांनी
भारताची शान वाढविली त्या
अज्ञात शिल्प - चित्रकारांना
ही कलाकृति सादर-समर्पण "

– कवि

महामहोपाध्याय, साहित्यवाचस्पति

# ❊ अभिप्राय ❊



**डॉ. दत्तो वामन पोतदार**
पद्मभूषण

कवि कुलकर्णी यांनीं आपलें 'वेरूळ महिमान' प्रसिद्ध केल्यानंतर 'अजिंठा वैभव' सिद्ध केलें. त्याला राजकवि यशवंत यांची प्रस्तावना लाभली आहे. आणखी काय पाहिजे? तथापि त्यांनी माझा अभिप्राय अपेक्षिला. मी गद्य माणूस. दृष्टि ऐतिहासिक. इकडे कवि तर लिहून गेले आहेत एक जागी–कसली मोजमापें घेत बसलात? तरीहि त्यांनीं त्यांना वाटलेली ऐतिहासिक अजिंठा–निर्मिति–कथा सांगितलाच आहे. तो बंध सुटणार कसा?

खरी गोष्ट अशी आहे कीं बुद्धाचा उदय झाला तेव्हां अशा लेण्यांची स्थळोस्थळीं निर्मिति झाली. मग जैन व हिंदु धर्मियांनी अल्पसे अनुकरण केलें. स्थूलमानानें अजिंठा लेणी दोन अडीच हजार वर्षांपूर्वी निर्माण झाली. सगळी एका वेळीच झाली नाहींत. ख्रिस्तपूर्व शे दोनशे वर्षं प्रारंभ होऊन पुढे दोनचार शतकांचा काळ हा या लेण्यांचा काळ ठरतो. ती प्रमाणें वगैरे चर्चा ग्रथित केलेले विद्वन्मान्य ग्रंथ उपलब्ध आहेत. ते जिज्ञासूंनी पहावे. असली काव्यें त्या कामाची नव्हेत.

बुद्धाची लेणी प्रायशः दुर्गम अरण्यपर्वतांतच उभारलेली असतात. त्यांत अजिंठा सर्व चित्रमय आहे. तेथें शत्रूंनीं जाऊन मोडतोड झालेली नाहीं. कवीनें तसे उद्गार काढले आहेत. वस्तुस्थिति अशी की बुद्धाची

चलती संपत आली आणि लेणी ओसाड पडली ! आधीच लेण्यांतील द्वारें लहान. त्यांतून मग लांडगे, कोल्हें, माकडे इ. पशू राहूं लागले. त्यांतच चोर दरवडेखोरांची भर पडली. त्यांनीं आंत स्वैंपाकपाणी करून निर्मिलेल्या धुरानेंहि आपला प्रताप गाजविला. बाहेर अरण्य फोफावले. माणसांचा राबताच बंद पडला.

लेण्यांनीं अशी दुर्दशा सुमारे १२–१३ शे वर्षें भोगली. मग आली ब्रिटिश राजसत्ता. एक गोरा सेनाधिकारी* घोड्यावरून त्या भागांतून जात असतां कांहीं लहान मुलें डोंगरांत एकदम भोकांतून आंत जातात पुन: बाहेर येतात असे पाहिले. हा चमत्कार पाहून त्यानें शोध घेतला. तोहि विवरांतून आंत उतरला तों आंत ही ऐसपैस लेणी ! मग पुढल्या धावपळीस प्रारंभ झाला. अजिंठा होता निजामराज्यांत. मग शोधक गेले. कारागीर, चित्रकार पाठविण्यात आले. संरक्षणाचें काम होऊं लागले. त्याची विस्तृत माहिती अहवालात आलेली आहे. सहज पाहिलें तर १६।११।७५ च्या महाराष्ट्र टाईम्समध्यें श्रीराम थत्ते यांचीं याविषयी वाचनीय लेखमालाच सुरूं आहे. अजिंठा लेणीं पावसाच्या पाण्याने फारच दुखावली. मोडली. मग अनेक रासायनिक तज्ञांनी विविध प्रयोगांनीं मोठें यश मिळवून तीं शक्यतों वाचविली. तीच आज आपण पाहतो आणि तोंडांत बोटे घालतो. अजिंठा चित्रांच्या हुबेहुब जशाचा तशा नकला मुळावरून कागद वगैरे लावून फार चिकाटीने कौशल्यानें सावधपणें प्रकाशितहि झाल्या. हें वैभव साऱ्या जगाला वाटले ! शोधाअंतीं या चित्रकारीचे सर्व स्वरूप उलगडता आले ! एक लेण्याला एकच दार. आंत अंधार गुडुप ! नाहींतर प्रकाशानें सारे रंग उडून गेले असते. हे व इतर पुष्कळ सूक्ष्मज्ञान आमच्या चित्रकारांना आणि प्रवर्तक भिक्षूंना होते हे निःसंशय ! कृत्रिम रंगांचा वापर केलेला नाहीं. अजिंठा पहाडांतच हिरवा, पिवळा, तांबडा रंग विपुल मिळाले. काळा, पांढरा यांचीहि वाण पडली नाही. निळा दूर लांबून आणावा लागला. बस,

---

* ( जॉन स्मिथ, सन १८१९ )

एवढेच रंग. तेहि टिकावू पार्थिव. आतां खोदलेल्या विस्तीर्ण गुंफांच्या भिंतींना टाकी लावून त्या सपाट केल्या. त्यावर माती, शेण, दूध, कापूस अशी मिश्रणें लावून बोटाच्या पेरा अर्ध्या पेरांच्या जाडीचे लेप देऊन त्यावर पुढे चित्रें काढविली ! आरशांचा उपयोग केला. प्रकाश मिळविला. छतावरहि चित्रें काढली. ती खाली छत बांधून कलम चालविले! सारेच अद्‌भुत! वाटते की हें काम माणसांचें नसून कोणा स्वर्गातून उतरलेल्या दैवतांचे असावे ! अशी ही चित्रांची किमयागिरी पाहण्यासाठी सारें जग लांबलांबून देशापरदेशांतून धांवून येत आहे. आणि पाहून तृप्तीचे ढेकर देत आहे ! या दिव्य कलेला वंदन करीत आहे.

अजिंठ्याचे हें भव्यदिव्य चित्रशिल्प वास्तविक पाहतां कवींना एक आव्हानच आहे. पण मला वाटते श्री. कुलकर्णी यांनींच तें प्रथम स्वीकारलेले आहे आणि आपल्या शक्तीप्रमाणें कामगिरी पार पाडली आहे. मनांत येते कीं हें पेलण्याचें सामर्थ्य ज्ञानेश्वरांचे ठायीं होते. त्यांनीं लेणीं पाहिली असावी. त्यांच्याच ज्ञानदेवींत त्यांनीं लेण्याचा उल्लेख केलेला आढळतो. पण त्यांच्या काळीं अजिंठा म्हणजे नुसते अरण्यच होते. नाहीं लाभला ज्ञानदेव तर नाही म्हणून का कुलकर्ण्यांनी लेखणी सरसावूं नये ? असेल अनंत आकाश तरी हि "आकाश अंत न कळोनिहि अंतरिक्षीं– आकाश आक्रमिति शक्त्यनुसार पक्षी ! " लेखणी आणि तूलिका यांचा झगडा कोणी रंगविला तर त्याला खचित बहार उडवून देता येईल. कुलकर्ण्यांनी अजिंठा लेणी पाहिल्या आणि ते एकदम आनंदले. टाळ्या वाजवून नाचूं लागले. "अरे हे पाहिलेत काय? ही स्त्री, हा बुद्ध, ते डोळे, ते ध्यान-काय भाव उमटविले आहेत चित्रकाराने! अरे या सारे या. पोटभर पहा. तुम्हीहि पहात सुटाल. एकदोन क्रमानें ही लेणीं आणि ही चित्रें पहा - ही चित्रें बोलतात आणि त्यांना जे स्फुरलें ते हें काव्य ! अजिंठा ही वस्तु नेहमीच टवटवीत आहे. तिला जरा मरण नाही. एकदा पहा पुन्हा पुन्हा पहातच रहाल. प्रत्येक वेळी नवा आनंद ! "प्रतिक्षणं यः भवता मुपैति तदेव रूपं रमणीयतायाः" प्या हे सौंदर्याचे प्याले ! आहे उपदेश आहे दिव्य कथा रंगविल्या आहेत. पण पेलेल ते तरी

घ्याल की नाहीं ? आवडेल ते लुटा. अशी ही चित्रांची सोनेरी खाण आहे. चित्रें तर पहाच आणि कुलकर्णी काय म्हणतात तेंहि वाचा ! रुचिला रुचि आनंदाला आनंद. आणि समाधानाला समाधान अशी जोड मिळेल. स्वत: कुलकर्णीहि थेट तेच म्हणतात. मग उशीर कशाला ? आणि माझी मध्यस्थी तरी कशाला ?

सही / दत्तो वामन पोतदार

वैकुंठ चतुर्दशी
सौर २६ कार्तिक १८९७
दि. १७-११-१९७५
पुणे

# प्रस्तावना

## अजिंठ्याची वाटचाल

"वेरूळमहिमान" हें छोटेखानी काव्य लिहून प्रकाशांत आलेले श्री. दिनकरपंत कुलकर्णी आतां दुसरी काव्यकृति घेऊन रसिकांपुढे येत आहेत. त्यांच्या स्फुट कविता मधूनआधून प्रसिद्ध होत असतातच. पण पुस्तकरूपाने कविता पुढे केल्यानें रसिकांचे लक्ष वेधले जाते. पहिल्या प्रकाशनाच्या वेळी सहकाऱ्यांच्या सौहार्दानें आणि माता-पित्याच्या आशिर्वादानें त्याचा छंद बहरण्याला स्फूर्ति मिळाली. तसे प्रस्फूर्त झालेले श्री. कुलकर्णी आज हीं नवीन कलाकृति विनम्रभावानेंच सादर करीत आहेत त्यांच्या मानसी अहंभाव उद्भवला आहे असें मात्र नाहीं.

पद्मभूषण महाराष्ट्रकवि यशवंत



श्री. यशवंत दिनकर पेंढरकर

सहज उमलणाऱ्या माझिया शब्दजातें
निवति रसिक की ना ठाउके हें न मातें
मम सगुण पदें मी सज्जनां वाहियेली
अगुण मज मुलाला भूषणप्राय झाली

कवि साधुदास यांची ही विनयशीलता धारण करूनच ते उभे आहेत. रससिद्ध रचना करणारे सिद्धहस्त कविराज जिथें विनम्रभाव धारण करतात तिथें प्रस्तुत कवीनें त्या विनम्रभावाचेंच प्रावरण ल्यालेलें असावे हें स्वाभाविकच आहे

आपली निर्मिती कोणत्या प्रतीची आहे हा रसिकांच्या विचक्षणतेचा प्रश्न आहे. पण त्यांनीं कांहींहि निर्णय दिला तरी कवीला निर्मितीचा आनंद लाभलेला असतोच. छंद हा ह्या दृष्टीने उपकारक असतो छंद अनेक प्रकारचे असतात. पण ज्यांत कलेशी संबंध आहे अशा सर्जनाचा छंद कांहीं आगळा आनंददायी असतो. मी कांहीं करूं शकतो ह्या आत्मविश्वाबरोबर मी कांहीं केले यांत वेळेचा सद्व्यय केला, मनाला गुंतवून ठेवले आणि एक पंथ दो काज ह्या न्यायानें अन्य कोणा सहधर्मीयांना कांहीं थोडाफार आनंद मिळाला तर कृतार्थता वाटत असते.

कवीचा प्रकृतिधर्मच असा असतो की जें कांहीं अंतर्यामीं उचंबळून येते तें शब्दावगुंठित केल्याशिवाय त्याला राहवत नाहीं. कवीचाच नव्हे तर सामान्य मनुष्याचाहि हा स्वभावधर्म आहे. चांदणे पाहून "काय चांदणें पडलं आहे!" तापणारें ऊन पाहून "काय रखरखीत ऊन आहे हो!" असे उद्गार सामान्य जनहि काढतात. पण ह्यांत केवळ अनलंकृत स्वभावोक्ति आहे. हाच स्वभाव कवीच्या मुखांतून जेव्हां मुखरित होतो तेव्हां त्यांतून रसात्मकता आणि सौन्दर्यहि प्रगट होत असते. म्हणूनच एका कवीनें म्हटले आहे—

जें रम्य तें बघुनिया मज वेड लागे
गाणे सवेंचि हृदयीं मग होय जागे

श्री. कुलकर्णी यांचे अगदी असेच झाले आहे. वेरूळची लेणी पाहून आल्यावर तेथील अनन्य साधारण आणि भव्योत्तुंग शिल्पकला पाहून उचंबळून आलेल्या अंतःकरणानें त्यांच्या लेखणीचा पदविन्यास प्रगट झाला. त्यांच्या या कृतीचे आप्तस्वकीयांकडून आणि सुहृदांकडून कौतुक झाले.

प्रोत्साहनानें गुणाभिवृद्धि । उपदेशानें चित्तशुद्धी
प्रयत्नानें लाभे सिद्धी । अनुभव हा स्वयंसिद्ध ॥

ह्या त्यांच्याच अनुभवाचें हे फलित. त्या प्रयोगानें आलेल्या हुरूपानें ते तसल्याच आनंदाची वाट चोखाळायला सिद्ध झाले. त्यांचा सौन्दर्यलोभीपणा त्यांना अजिठ्याला घेऊन गेला. "बोलवीता धनी वेगळाची" अशी कवितेबाबत साधुवाणी आहे. इथे तोच धनी चालविताही झाला. फुलातल्या मधुगंधाकडून जसे भृंगाला आमंत्रण मिळते तसे सौन्दर्याकडून कवीलाहि पाचारण येते. पाणी उचंबळून यायला तसे पाहायलाहि मिळाले पाहिजें. ते पाहायला कवीनें अजिठ्याची वाट धरली. भारताला भूषण झालेले आणि कलावन्ताला आनन्दाचें भांडार असलेलें ते अजिठ्याचे नितांत रम्य स्थळ ! तिथें कवीचे अंतःकरण भारावून गेले. आनंदाच्या बेहोषीनें बोलायला प्रवृत्त झाले. तेच हें काव्य.

कितीक शतकांपूर्वीची चित्रकला, रंगकला आणि शिल्पकला तिथें विलसत आहे. ती खरी कला की जिनें चित्ताचें उन्नयन होईल.

"संत चरित्रें परम पवित्रे सादर वर्णावी"

हे योग्यच आहे पण 'वर्णावी' म्हणजे शब्दात छंदोबद्ध करावीत इतकाच माफक अर्थ कां घ्यावा ? लिपीनिविष्ट वर्णन साक्षरालाच कळायचे. निरक्षराची सोय काय? तर निरक्षराची लिपी म्हणजे चित्रकला व शिल्पकला. चित्र बोलके असायला पाहिजे. तरच ते "कला" या पदवीला पोचते. खुर्चीचें सरळ सरळ चित्र काढले तर ते ठोकळेबाज बाळबोध चित्र होईल पण खुर्चीचा एखादा पाय मोडका आहे आणि त्यावर एकादी व्यक्ति निर्धोक बसली आहे असें चित्र काढले कीं त्याला अर्थ प्राप्त होतो मुद्राभिनयानें आणि अंगविक्षेपाने काढलेले चित्र भावाविष्कार करायला समर्थ होते. मग त्या भावाविष्काराला अधिक सघनता यायला पार्श्वभूमि, निसर्ग, पशुपक्षी इत्यादिकांची समुचित जोड दिली की त्या मुख्य चित्रांतल्या भावाविष्काराला उठाव येतो. त्याचा उत्कृष्टपणे परिपोष होऊन उत्कटताहि लाभ एकाकिनीचा भावव्याकुल चेहरा तसा बोलका असतो. पण तिच्या

मनगटावर पोपट बसलेला दाखविला की व्याकुळतेचें हृद्गत उमगते. अशा अनेक अंगोपांगांनी अलंकारांनी चित्रकाराने अभिप्रेत असलेल्या भावचित्राला सजविले म्हणजे ती कला प्रेक्षकाला भारावून टाकते.

श्री. कुलकर्णी अजिंठ्याच्या चित्रकलेने असे भारावून गेलेले आहेत. ही चित्रसृष्टी निर्माण करणारे केवळ " कलेसाठी कला " ह्या वृत्तीचे नव्हते जीवित विषयक तत्त्वज्ञानाची, धर्मपंथीय श्रद्धेची, मानवी जीविताच्या सार्थकतेची त्यांना ओढ होती. चित्ररूपाने त्यांनी प्रतिसृष्टीच निर्माण केली आहे. जीवितांतील सर्व सोहळ्यांचे त्यांनी महाकाव्यच लिहिलें आहे. चित्रें चितारण्यात त्यांनी तपेच्या तपे घालविली आहेत. तद्द्वारां साधना केली आहे. आत्मोन्नति साधली आहे. आणि भावी पिढ्यांसाठी हा अलौकिक वारसा ठेवून दिला आहे. श्री. कुलकर्णी ह्यांनी हे बरोबर हेरले आहे ठायी-ठायीची वर्णने वाचतांना त्यांनी किती बारकाईने निरीक्षण केले आहे हे ध्यानी येते. वेषभूषा, दागदागिन्यांची विविधता, प्रफुल्ल वृक्षवेलींची संपन्नता, पशुपक्ष्यांची क्रीडा, त्यांच्या नजरेतून काहीही सुटले नाही. ते इतके भारावून गेले आहेत की आपल्या गायनांत कुठेकुठे पुनरुक्ति तर होत नाही ना, याचीहि जाण त्यांना राहिली नाही. गवयी नाही का तीच ती ओळ पुनः पुन्हा आळवीत ! पण हे स्वाभाविक आहे :—

बोलिलेचि बोलावे
सांगितलेचि सांगावे

लागते; म्हणजेंच ते वाचकांच्या चित्तांत रुजते.

काव्यशास्त्रविषयक निकषावर ह्या लेखनाचा कस कोणी विद्वान लावू गेला तर त्याला दोष आढळतील. रचना शैथिल्य दिसेल. पण त्या काटेकोरपणाकडे श्री. कुलकर्णी यांनी काणाडोळा केला असावा. लेण्यांची क्रमवार वैशिष्टये सांगताना त्यांतील भावार्थगर्भ सौंदर्यावर फक्त त्यांची नजर आहे. किती सांगू, किती गाऊ असे त्यांना झाले आहे. लुब्धाला असेच होते. " ग्राम अजिंठा ओलांडियले पुण्यक्षेत्र आले " इथूनच्या बारा ओळी पाहा. त्याचप्रमाणे " अहो, पर्वत सौन्दर्य निर्मिणारे " येथपासून असलेले डोंगरमहात्म्य :— त्यांत ते रंगून गेले आहेत.

घाव छिनीचा पडतां पहिला
निनाद नव उमटले

येथपासूनच्या काव्यपंक्ति कवीच्या कल्पनाविलासाची साक्ष देतात. तत्त्वज्ञान तर पदोपदी उमटले आहे. अवतरणें देऊन प्रास्ताविकाचा विस्तार करण्याची आवश्यकता नाहीं. कोणचेहि पान उघडा ते डोळयांत भरेल, मनांत शिरेल आणि वाचकाला अंतर्मुख बनवील. श्री. कुलकर्णी यांनीं त्याचा एकसारखा घोष चालविला आहे. पशु, पक्षी, क्रीडा, पानें, फुलें, वेली, उत्सव यांचा भरगच्चपणा त्यांनीं टिपला आहे. सत्यशिवसौन्दर्याचा ते जपच करीत आहेत असे वाटते.. शृंगारचेष्टितांनाही जीवितांत स्थान आहे; पण त्याचा अवास्तव उन्मादक बडिवार या कलाविश्वांत नाही हेहि सांगण्याकडे त्यांनीं अवधान ठेवले आहे.

सारांश, साऱ्या काव्यांत ते आनंद सागरांत डुंबत आहेत असे दिसेल. " चित्रोचित्रीं प्राण भरा " असे जें एक पद आहे त्यात :-

आम्रतरूला फळें लागता
नच तो उरतो त्याचा भोक्ता
जनाकारणें जीवन जगतां
सहज लाभतो मोक्ष खरा

हा जो संदेश दिला आहे त्यांत निष्काम कर्म करण्याचा महामंत्रच उमटला आहे. असें हें सुन्दर काव्य श्री. कुलकर्णी यांच्या काव्यसाधनेंतली वरची पातळी ठरेल असे मला वाटते.

पुणें १।७।१९७५ सही-यशवंत दिनकर पेंढरकर

# हृद्गत

प्रस्तुत काव्यकृति रसिकांचे हातीं देताना अंतःकरण अत्यानंदाने उचंबळत आहे, नाचत आहे. कारण विश्वविख्यात वेरुळ-लेणींचे काव्याद्वारें "महिमान" सादर केल्यानंतर तेवढ्याच प्रख्यात असलेल्या "अजिंठा-गुंफांचेंहि" काव्यरूप दर्शन घडविण्याचा पुण्ययोग आज सिद्धीस जात आहे. त्यांत आणखी एक वैशिष्टयपूर्ण कस्तुरी-सुगंधयोग म्हणजे या कलाकृतीस पद्मभूषण म. म. डॉ द. वा. पोतदार आणि पद्मभूषण महाराष्ट्र कवि यशवन्त यांचा अनुक्रमें अभिप्राय-आशिर्वाद व प्रस्तावना या रूपानें भाग्य-स्पर्श घडून आला आहे. निर्लेप मनानें व अंतरीच्या गाभ्यापासून निर्माण झालेली "अजिंठा" येथील शिल्प-चित्रांची खाण खचित भान हरपविते, मनोरंजन आणि ज्ञानाबरोबरच प्रबोधन करुन चित्ताचें उन्नयनहि घडविते. त्या अप्रतिम कलानिधानाच्या प्रत्यक्ष दर्शनानें रसिक-मानस-सरोवरांत कोणत्या व किती आनंदलाटा आणि भावच्छटा निर्माण होतात हें सांगणें कल्पनातीतच ! जें हातीं आलें ते काव्यबद्ध झाले ! पण असे कितितरी स्वर्णकण लेखणीच्या पकडीतून सरसर दूर पळून गेले ! तेवढी धांव घेणें हे अतिमानवी काम ! तें माझ्यासारख्या तुटपुंज्या पाईकाला कसे जमावे ? जें लाभले तें काव्यसूत्रात गुंफले ! तेव्हां रसिकहो ! या कलाकृतीच्या मनमुराद आस्वादनाबरोबरच त्या थोर थोर अज्ञात शिल्प चित्र-कलाकारांना, श्रमिक, प्रेरक, योजक, रक्षक व आश्रयदात्यानांहि धन्यवाद देऊ या ! कारण त्यांच्याच कृतिवैभवाचें हें वर्णन आहे.

त्याच अनुषंगाने ज्यांच्या मार्गदर्शनामुळे ही काव्यकलाकृति प्रकाशात येत आहे. ते ज्येष्ठ पत्रकार, राज्यतारंगाचे लेखक व "करवीर रियासत" कर्ते श्री. स. मा. गर्गे यांचें मनःपूर्वक आभार मानणें माझें परम कर्तव्य समजतो.

चित्रकार श्री. कडू, जनता प्रिंटिंग प्रेसचे चालक व कामगार मंडळी आणि सर्वहितचिंतकांचेंहि हार्दिक आभार मानून हें हृद्गत पुरे करतो.

—कवि



गुंफा क्र. १



गुंफा क्र. १



गुंफा क्र. २



गुंफा क्र. १७



गुंफा क्र. १७

# अजिंठा-वैभव

सह्यगिरीच्या ' इन्ध्याद्रि ' श्रेणींत ' अजिठा ' वसे
तीर्थस्थळ बौद्धांचे जें असे ।
दोन सहस्रांहुनिही अधिकचि वर्षांचें तें असे
जगीं महदाश्चर्यचि गमतसे ।
धर्मप्रचारासाठी जरि ती रचना त्याची असे
चिरंतन त्यांतिल ठरले ' ठसे ' ।
शतावधी वर्षांचा ज्याप्रत काळ लागला असे
घडविण्या किमान तो आठशे ।
' महायान ' अन् ' हीनयान ' पंथें नि ' शातकर्णिनें '
निर्मिली लेणीं हें कळतसे ।
' वाकाटक ' नृप हरिषेणाचे सचिवें लेखचि वदे
' आई-वडिलांचे स्मृतिस्तव ' असे ।
दंतकथा कुणि आणि सांगती ' आचार ' अर्हतें
मातृस्मरणार्थ निर्मिलें असे ।
उभारणी लेणींची आणिक शिल्प-चित्र-निर्मिती
कुणी सांगा परि केली असे? ।
' बुद्धाचे अनुयायी होते ' नाग ' कलाकार ते '
असे कुणि संशोधक म्हणतसे ।
इतिहासाचा धांडोळा तर निराशाच देतसे
पुरावे उपलब्ध न फारसे ।
कुणि नच कारागिरें ठेविले लिहूनि या विषयिचें
प्रस्तरावरी कुठें अल्पसे! ।
आत्मस्तुतिचें वलय खरोखर मोहमयी तें असे
मुमुक्षू-जनांस फसवीतसे ।

कमलपत्र जैं अलिप्ततेने सरोवरीं खुलतसे
त्यापरी वर्तन त्यांचें असे ।
त्यागमूर्ति त्या जगदोद्धारा जीवन त्यास्तव असे
अपेक्षा त्यांना कुठला असे ?
ईश्वरांश ते, पुण्यसिंचनें पावन जग होतसे
वदना त्यांच्या वपु झुकतसे ।
आम्रवृक्ष तो फलभारानें विनम्रसा लवतसे
काय तो प्रौढी मिरवीतसे? ।
श्रेष्ठ गुणांची अशी साधना सुंदरता स्रवतसे
लाविते सदा जिवाला पिसे ’ ।
या सुविचारें कलानिधींनी अहंगंड खंडिले
घेतले महान् तपांचे ‘ वसे ’ ।
शिल्प–चित्रयुत कलाकृतींचें सम्मेलन गमतसे
अखिल या विश्वास्तव तें असे ।
‘ जन्मा यावे आणि बघावें ’ असेंच स्थळ तें असे
वनश्री सभोंवती नटतसे ।
परिसर तेथिल सुंदर मोहक वेधक तो भारी
पर्वत–श्रेणी विशाल शामल स्फूर्तिप्रद सारी
निळसर लोडांवरी नभाच्या विसावले ते गिरी
गगनालाही मौज वाटते रात्रंदिन भारी
तें कलाकृतींचें पवित्र प्रसिद्ध स्थान
ज्या देती सारे आदरपूर्वक मान
तें चला पहाया जाऊं थोर–लहान
आकंठ करूं या सुखामृताचें पान
ग्राम ‘ अजिठा ’ ओलांडियलें पुण्यक्षेत्र आलें
हेंच हेंच तें दिव्य मनोरम बौद्ध–क्षेत्र आलें
धर्मक्षेत्र हें, तीर्थक्षेत्र हें, तपोक्षेत्र आलें
महाक्षेत्र हें विभव–क्षेत्र हें वंद्य क्षेत्र आलें

ध्यानक्षेत्र हें ज्ञानक्षेत्र हें योगक्षेत्र आलें
मोदक्षेत्र हें ध्येयक्षेत्र हें सिद्धिक्षेत्र आलें
मननक्षेत्र हें विजनक्षेत्र हें स्तवनक्षेत्र आलें
चित्रक्षेत्र हें शिल्पक्षेत्र हें कलाक्षेत्र आलें

स्फूर्तिक्षेत्र हें पूर्तिक्षेत्र हें सृजनक्षेत्र आलें
अजर क्षेत्र हें अमर क्षेत्र हें शान्तिक्षेत्र आलें
किती तऱ्हांनी वर्णावें म्यां क्षेत्र मात्र आलें
नाम ' अजिंठा ' असे तयाचें प्रमुदित मन झालें

या क्षेत्रान महाराष्ट्रभू कीर्तिपदो चढविली
या क्षेत्रानें भारतभूमी जगीं अमित मिरविली
या क्षेत्रानें कलादालनां सौंदर्ये नटविलें
या क्षेत्रानें वैशिष्टयांनीं स्तिमित जगहि केलें

यात्रा की भरली असे गमतसे हौशी प्रवासी किती
देशी आणि विदेशि लोक जमले गुंफा बघायाप्रती
कोणी त्यांतहि चित्रकार असती तैसेच संशोधक
मूर्तीकार कुणी, विशारद गुणी, अभ्यासु वा शिक्षक

नाना हेतु मनीं धरोनि जमले कीर्तिस्थला पाहण्या
उल्हासें फिरती इतःस्ततः कसे, जाणें पुढे आपणां

पायऱ्या चढतां ।
भरभर वर चढतां ।
येतसे नवलचि दृष्टीपथा ।।

द्वार तें दगडी
दगडी छोटेसें ।
पार तें करुं या उल्हासें ।।

दृश्य सोनेरी
गहिरें चंदेरी ।
मुलायम दिसतें सामोरी ।।

अष्ट दिग्भागीं
कोष निसर्गाचा ।
उधळितो चुरा मोतियांचा ॥

दिशा अन् दोन
"उर्ध्व" आणि "निम्न" ।
फुलविती उल्हासें वदन ॥

पर्वतावरती
वृक्ष नि वेलींची ।
असे घनदाट निबिड वस्ती ॥

वृक्षवेलींचा
भूषणसंभार ।
त्यापुढे फिके रत्नहार ॥

सूर्यकिरणाचें
'जाल' तेजदार ।
मिसळलें त्यांत रंगदार ॥

झळाळे कांती
अपूर्वरमणीय ।
पामरा नसे वर्णनीय ! ॥

खालती बघतां
मोठी खोल दरी ।
दरींतुनि वाहे 'वाघूरी' ॥

नितळ तें पाणी
चमचमते भारी ।
तोष दे मनास सुखकारी ॥

क्षणीं मज गमले
रूप रंजनीय ।
साठवू कुठे ? कसे काय ? ॥

बिंब मग टिपिलें
सहज ' बिंब-यंत्रें ' ।
मुग्ध मी झालों जणुं मंत्रें ।।
कष्ट चढण्याचे
सकल सकल सरले ।
अंग उल्हासें रसरसलें ।।
वायुच्या लहरी
झुळझुळल्या सहज ।
वाटली मनास बहु माज ।।
षड्‌ऋतू येथें
फुलता सर्वांगें
मूर्तिमान् सुंदरता रंगे ।।
सकलही दृश्यां
चित्रित जरि केलें ।
मूळचा गोडवा न मग ।।
बालकें जरिही
स्तन्यपान केलें ।
प्रेम का मातेचें सरले ? ।।
जरी पक्वान्नें
अम्हां तृप्त केलें
रुचिरतादिक गुण परि उरले ! ।।
तसा की येथें
निसर्ग बहु नटला ।
वैभवा भाग उणा कुठला ? ।।
वळवितां दृष्टी
उजव्या अंगाला ।
अचबा थोर मला गमला ।।

( ६ )

सुरूं की झाला

परिसर रमणीय ।

अर्धचद्राकृति जणुं हार ! ।

आहोत आपण जन सामान्य । जे जें दिसेल असामान्य । पाहोनि व्हावें धन्यधन्य । रसास्वाद अन् चाखावा ।। एखादें गाणें गुणगुणावे । अथवा मनासारिखे रचावे । स्वानंदमार्गें चालावे । साधा अपुला जीवन-मार्ग ।। येथील महाकलाकृती । पहाव्या कैशा निमिषमात्रीं । सांठवाव्या कैशा चित्तीं । यथामति परि यत्न करूं ।।

गुंफांचिये खालीलभागीं । प्रवेशव्दाराचिये दोही अंगी । गजव्दय ते नेमिल्या जागीं । प्रस्तरावरी कोरलेले ।। उभय कुंजर अखंडित । नम्रभावे करिती स्वागत । लवोनिया आनंदांत । मुजरा करिता अभ्यागतां । स्नेहल सहर्ष त्यांच्या मुद्रा । मागे सारिती शीतल चंद्रा । जणूं का स्नेहप्रेमाचा पापुद्रा । वदनांवरती सांकळला ।। 'या, या' म्हणोनि बोलाविती । शुंडा अपुलाल्या नमविती । पाय ते पुढील मुडपिती । झुकतो सादर प्रेमानें ।। हत्ती साक्षात् ऐश्वर्य-लक्षण ।। भाग्यसमृद्धीची खूण । सुयश कीर्तीनें त्रिभुवन । भरभरोनि टाकितात ।। ऐशिया शुभत्वाचें दर्शन । आपुलकीचें आमंत्रण । जेणें हेलावते मन । समाधान हो अपार तें ।। आदराची ती भावना । आपुल्या मनीं मावेना । सोत्कंठें डोलावुनी माना । स्वीकारूं या स्वागतातें ।। कौशल्य तें शिल्पकाराचें । कौतुक किती करूं तयांचें ! । आनंदातिशयें हृदयाचें । सरोवर लागे उचंबळू ।।

प्रथम क्रमांकाच्या लेणीपासून । घेऊं कलेचें विलोलदर्शन । पुरातन हें प्रदर्शन । पाहूं आतां क्रमवार ।।

( १ )

समोर अगदी मध्यभागीं । विशाल बैठी मूर्ति विरागी । अनुराग

भरला जिचिया अंगीं । 'बुद्ध' सुमूर्ति विख्यात ।। धर्मप्रवर्तन मुद्रेत । बुद्धमूर्ति आसनस्थ । गंधर्व पुष्पवर्षाव करित । शान्तिब्रम्हावरती या । समोरोनि पाहतां ध्यानस्थ । दुज्या बाजूनें बघतां दिसे दुःखांत । जातां समीप शान्तचित्त । विविध भाव होती दृग्गोचर ।। शैशव तारुण्य प्रौढत्व । तैसेच तेही वृद्धत्व । आयुष्यदशाचें अवस्थातत्व । मिनले जणुं या पुतळ्यांत ।। टाकितां मूर्तीवर प्रकाशझोत । भिन्नभिन्न भावतरंग उमलत । निरागसतेचा ओतप्रोत । निर्झर वाटे खळाळतो ।। एकदा दिसे परमकारुण्य । एकदा आनद अग्रगण्य । कृपेचा वाटे जणूं पर्जन्य । स्नेहप्रेमरूपी वर्षताहे ।। हें जे भाव–स्वभाव दर्शन । गमे मजप्रती जीवनदर्शन । एकेच ठायीं अवलोकन । करण्याचे सद्भाग्य लाभतसे ।। समत्ववृत्ति ममत्ववृत्ति । स्नेहलवृत्ति प्रेमळ-वृत्ति । अंतर्बाह्य सुशान्तवृत्ति । ऐशी मूर्ती बुद्धाची । जों जों पहावे मूर्तीकडे । हृदय–कपाट होई उघडें । प्रेमचि प्रेम तें चहुकडे । ऐसी अवस्था घडते पैं ।। अहंभाव तो गळोनि पडे । पूर्ण समाधान हो रोकडे । तत्त्वदर्शन सुंदर घडे । तन्मयावस्था प्राप्त होई ।

प्रस्तरांच्या प्रचंड भिंती । ज्यावर चित्रांचीच वस्ती । सौन्दर्यपूर्ण कलाकृती । निवान्त निरखू या आता ।। पहा पहा ती वारण–झुंज । भांडती जैसे सामर्थ्यपुंज । सिंहारूढ स्वार, सहज । दृश्य ऐसे क्षोमकारी ।। हत्ती ओढी अजगरातें । भीषण घटना थरकांप करिते । अत्युग्र ऐशा जीवन-कलहातें । जणू येथे चित्रियले ! ।। आंत जे का मोठे दालन । शिल्प तेथें शोभायमान । स्तिमित करी जे प्रेक्षक–मन । न्याहाळूं तें स्वानंदें ।। गोजिरी रम्य नितान्त । पहा तीं हरिणें निवान्त । चार जरी आपणां भासत । एकाच वदन तें प्रत्यक्ष ।। कोणी रसिक एवढेंच बघून । आनंदानें करिती नर्तन । शिल्पकौशल्य तें देखून । म्हणती करामत खरोखरी ।। बघतां मृगांचे कमनीय देह ।। अचंबा वाटे निःसंदेह । आनंदातिशयासह । प्रेक्षक तोष हृदयांत ।।

सिबि–कथेसी चित्रित केलें । बोधिसत्त्वें कबुतरा तारिले । ससाण्यास

स्वमांस देऊं केलें । बघतां प्रसंग रोमांच ये ।। परम दयाळू वृत्तीनें । दुष्ट वृत्तीस आळा घालणें । हृदयपरिवतन आणिक करणें । मनांत हेतू बुद्धाच्या ।। ' भूतमात्रांवर करा दया । सुधन्य करा अपुली काया । पोहोंचवा जीव मोक्षालया ' । तयाचा निरंतर संदेश ।।

मारासुरें केली छळणूक । बुद्धासि दिधले म्हणती दुःख । अविचल राहिला बुद्ध देख । प्रसंग सारा चित्रियला ।। ' मार ' नसे तो असावा ' सुरवर । दृष्टी सारी सिंहासनावर । खपे न कोणी त्या नृपवर । तपस्या होई असहनीय ।। कोणी करितां मख शंभर । इंद्र घाबरा होई थोर । कारवाया करोनि घोर । तपस्या सारी हाणोनि पाडी ।। देखोनि बुद्धाचें तपोवैभव । बेचैन होई इंद्र सदैव । नच जाणोनिया पुण्य–ठेव । उगाच पाठीशी लागलासे ।।

" झाला श्रेष्ठ महीवरी नर असे तो बुद्ध नामें बहू "
माझें स्थान हरोनि घेइल जणों देवेंद्र लागे भिऊ
पाचारोनि तयें कुबुद्धियुत जे जे राक्षसी षड्रिपू
आज्ञा देइ तयांप्रती " त्वरित हो जा भ्रष्टवा तद्वपू "

हातीं घेउनिया भयाण आयुधें तात्काळ ते धांवती
मुद्रा त्या असुरांहुनी भयकरा बुद्धा छळू लागती
राहे शांतचि तो कदापि न ढळे पद्मासनापासुनी
शोभे हास्य मुखीं जया न उपमा द्यायास या भू-वनीं

झाला की निरुपाय पूर्ण म्हणुनी चित्तीं रिपू कोपतीं
झाली कुंठित तन्मती नि सरली शक्ती तशी ती धृती
कामातें परि एक युक्ती सुचली सांगू तुम्हां काय मी !
चित्रीं जी कमनीय येत दिसुनी ऐका ! अतां रे तुम्ही

पाचारोनि तयें असंख्य मग त्या नृत्यांगना, रूपिणी
आज्ञापी सकळां ' करा वश चला, त्या साधकाला झणीं '

झाल्या सिद्ध पऱ्या सुरेख सुदती
घालावया मोहिनी
शृंगारें सजल्या सुडौल सुगती
घालावया मोहिनी
आल्या नाचत त्या प्रमत्त ललना
घालावया मोहिनी
नेत्रांतून अमोघ बाण सुटती
घालावया मोहिनी
शोभा मत्त मदें मुखीं विलसते
घालावया मोहिनी
कामाचा जणु कोष मुक्त विहरे
घालावया मोहिनी

शस्त्रानें शरिरास छेद मिळतो आत्मा मरे ना कधी
कामादी रिपु होति कारण परी आत्म्यास पतनाप्रती
नाहीं तो परि पुण्यमूर्ति ढळला तेजोमयी 'बुद्ध' तो
वैराग्यांत वसे विशुद्ध वृत्ती तपमग्न शान्तींत तो
शान्तीचा पुतळा प्रणम्य सकलां कारुण्यसिंधूच तो
विनटे सत्त्वगुणें प्रभावशाली शोभे महात्माच तो
गेला कामहि तो निघोनि परता आला तसा मागुती
देवेंद्रहि लाजे कळोनि महती वंदी मनीं तो 'यती'

हें चित्र जें रंगवियलें सुरेख
'विजगीषु चारित्र्य' ही ज्यांत मेख
अतिश्रेष्ठ निश्चलतेचें प्रतीक
सत्त्वादि गुणसंपदेचेंच पीक

ऐसेचि चित्र सव्विसावे लेणींत। 'मार' नामें दैत्य कुविख्यात। बुद्धास अतीव भेडसावित। शान्ति ढळावया परोपरी॥ पुत्री ताना, रति, रंगा। प्रवृत्त होवोनि करिती दंगा। शेकडों कामिनींना घेवोनि येती॥

नाना भूषणांनीं जरी त्या नटल्या। कामोद्दीपन करूं धजल्या। तरी तो 'बुद्ध' कांहीं केल्या। अणुमात्रहिनच आंदोळे।। अहो जो प्रत्यक्ष ईश्वरावतार। काय तो विचलित होणार ?। भंजक मात्र खजिल होणार। नरकार्णवीच पडणार।। बुद्धाची ती अढळ शान्ती। देई सकळांना परम गती। असला जरी कुणी कुमती। हृदयपरिवर्तन होणार।। " साधुसज्जनांचा जे करिती छळ। ठरतो त्यांचा पराभव अटळ। श्रीकृष्णोक्त हें तत्त्व समूळ। गमते येथें गुंफियले।।

इंद्र-इंद्राणीचें दर्शन। सौन्दर्याची करी उधळण। वस्त्रालकरांचें सुंदरपण। दृश्यमान हो अपूर्व तें।। 'पद्मपाणी' ची ती कमनीय प्रतिमा। सौंदर्याची जी परिसीमा। वर्धिष्णु करी अपुला प्रेमा। दिव्य चित्र तें पाहतांच।। मस्तकीं सुंदरसा शिरपेंच। रत्नकिळेची खेंचाखेंच। किती करावी नयनें वेंच। ऐसे जाई होवोनी।। पहा कोठल्याही बाजूने। आपणां बघती तल्लोचनें। स्नेहप्रेमाच्या सिंचनानें। मानस पाहे तोषविती।। चित्रकारांचिये सदनीं। प्रतिमा ही आदर्श म्हणुनी। येईल कुणाही आढळोनी। पुसा कुणाही रसिकाप्रती।।

एक जरी घडला प्रसंग। उपजती नाना भावतरंग। ढवळूनि निघे अंतरंग। क्रिया-प्रतिक्रिया नानाविध।। पहा की जलाशयाच्या पृष्ठीं। खडा टाकितां तरंग उठती। लहरीवरी लहरी येती। भरभर भरभर वलयाकारी।। तैसेच मानवी जीविता माझारीं। कांहीं घडतां नवल जरी। नाना भाव हृदयांतरीं। प्रत्येकाच्या उठतात।। स्वरूप जैसे प्रसंगाचें। तैसेच उद्भवणें भावनांचें। स्वरूप जैसे अन् घटनेचें। तैसे वागणें घडते की।। मुख्य भाग चेहऱ्याचा। जो की 'ऐना' अंतराचा। बिंब-भाग स्वभावाचा। अविष्कार सुरेख दाविंतसे।। वार्ता ऐकतां एखादी। कुणास वाटेल तयांत गोडी। अन्यांसि अथवा नावडी। त्रयस्थ राहील तटस्थचि।। जेतुली आहे आत्मीयता। तेतुली घडते आस्वाद्यता। नवल नव्हें हें तत्त्वतां। अनुभवसिद्धचि भाग असे।।

आतां चित्र पहा पहा हें । राजासमोर काय होताहे । नृत्यांगना एक लवली आहे । सुडौल सुगोल बांधा तिचा । नितळ गौर सुंदर वर्ण । भूषणांनीं मंडित कर्ण । आभरणांनीं सर्वांग पूर्ण । शोभायमान दिसे तिचें ।। नृत्याचिया पावित्र्यांत । चरणीं राजाचिया नमत । आनंदभावना उचंबळत । रायाची नजर संतोषली ।। मदाची विद्युल्लता लखलखली । धुंदी दरबारांत पसरली । सभा सारी त्यांत रंगली । नूर आगळा प्रमत्त तो ।। एक ललना मागल्या स्थानीं । कुजबुज करी आणिक कुणी । डोळे त्यांवर वटारुनी । सेवक रोषाने पाहे ।। कोणी विस्मित कोणी सस्मित । कोणो सुखेनैव आनदित । मानवी चेहऱ्यांच्या संमेलनांत । भावाभिव्यक्तीचें प्रदर्शन ।। करांचें आणिक कुंचल्यांचें । संगनमत तें मनोज्ञ सांचे । कौतुक वाटे चित्रकारांचे । अलौकिक त्यांचें प्रतिभा–बल ।। नृपाचिया मुखावरील भाव । जणूं कामदेवाचाचि चेव । प्रत्येकाचा जैसा स्वभाव । त्यापरी भावना दृग्गोचर ।।

इराण देशीचा वकील कोणी । आला दरबारांत म्हणोनी । 'बदामीचा' तो नृपमणी । 'दुसरा पुलकेशी' स्वागत करी ।। प्रसग चित्रिला हुबेहुब । हावभावांची विशिष्ट ढब । बोलण्याची आणि लकब । राजदरबारचि रेखाटिला ।। करावे जैसे पुस्तक–वाचन । आणिक घ्यावी गोष्ट जाणून । तैसे चित्राचे अवलोकन । जेणें अवघे ध्यानीं ये ।। व्दारमंडपापासोनि अखेरपर्यंत । नक्षीची अखड बरसात । पहावयाची सरसश्रेष्ठ । आहेच पुढील लेणींत ।।

( २ )

व्दितीय सुंदर लेणीमाजीं । स्तंभभागीं फुलें ताजीं । मध्यदरबाजाची कुसरजीजी । त्यांवर दांपत्यें शिल्पियली ।। सुमन–विश्व तें स्तंभावर । दर्शन ज्याचें अतिसुखकर । पुढें दिवाणखाना थोर । विशालत्त्वें विलसतसे ।।

झुंज रंगविली बोकडांची । रंगत रंगविली कुस्तोची । यक्षकिन्नरादिक मुलांची । रंगमय चित्रें नानाविध ।। गौतमाचें चित्रित बालपण । 'असित'

गुरु देती शिक्षण । सकौतुकें नृप ऐके भाषण । दृश्य अंतरा उचंबळवी ।। बालकाच्या लीला पाहून । आनंदातिशयें फुलतें मन । चित्रांकित केली मोद-खाण । चित्रकारांनीं चातुर्यें ।। ‘ गौतम ’ काढी धुळाक्षरें । लक्ष वेधते तेथें सारे । अभ्यास त्याचा होई निर्धारें । कौतुक वाटे बालकाचें ।। वदनावरील भाव गोड । चिमुकलें कमलापरी तोंड । रूप तें लावी अहो वेड । लहरी सुखाची उचंबळे ।। एकशेदहा बुद्धमूर्ती । आरूढ तांबडया कमळांवरती । प्रसन्नतेची भावाभिव्यक्ती । सतेजतेनें झळकतसे ।। बुद्धाच्या ऐशा सुंदर प्रतिमा । चितारल्या भिंतीवरी निरुपमा । प्रशान्त भावाची परिसीमा । वदनांवरती विलसतसे ।। चित्त होई प्रफुल्लित । आगळा प्रभाव होई उदित । सत्यशिवसौंदर्याच्या सरोवरांत । सुस्नात झालोंसे वाटे ।। अहो आपले भाग्य केवढे । अमूर्त मूर्तचि आपणांपुढे । पावित्र्याचें हें रूपडे । दर्शनार्थ जे लाभ-तसे ।। आम्रतरुतळीं बुद्धमूर्ती । जेथ लेखाच्या उधृत पंक्ती । ‘ प्राणिमात्रां होवो पुण्यप्राप्ति । ‘ धर्मदत्ते ’ हेतु निवेदिला ।।

छतावरती कलाकुसर । हंसी चक्रीं धरिती फेर । सहजलीलांचे मनो-हर । दर्शन सुरेख सुखपूर्ण ।। प्रत्येकीची ढब वेगळी । भावच्छटा अन् आगळी । मानसीं तयांच्या आणि शिरली । कलाकार चित्रकार मंडळी जणूं ।। वेलबुट्टयांची तुताऱ्यांतून । विलोभनीय केलीसे गुंफण । कौशल्याची सुबक भिरवण । स्वर्णकारासम कर्म ।। सुवर्णमृग ते पुढे झळकती । अंतःकरणा कसे खुलविती । आनंदाला येई भरती । अभिनव सुंदर सहजाकृती ।। कुणा म्हणती कालिदास-प्रतिभेच्या खुणा । उपयोजियल्या ही लेणी चितारतांना । मृदुंग तबल्यांचे आवाज स्तंभांना । स्तंभित होई मानस पै ।।

आदर्श हिंदूंचिया संस्कृतीचा
स्वीकारिला बौद्ध धर्मांत सांचा
गुंफेमधें जे दिसे ठायिठायीं
सपूर्ण हें तत्त्व सुस्पष्ट होई

मध्यभागीं बुद्धमूर्ति । साक्षीभूत जी निगुती । कलाकारांची तीच स्फूर्ती । दर्शनमात्रें संतोष ।।

—: ४ :—

क्रमांक चारचे लेणीमध्यें । ‘पद्मपाणी’ बुद्धाची मूर्ति मधे । वाद्यें घेवोनि वादक उभे । संगीत–सभा होणार जणूं ।। संसार–सागर म्हणजे वासनांचें आगर । असिलतेची किंवा तीक्ष्ण धार । नाशार्थ टपला काळ क्रूर । क्षणोक्षणीं तो संधि बघे ।। भवाब्धीच्या विक्राळ लाटा । फांसा टाकिती उलटा । जीवांच्या बांधोनिया मोटा । घेवोनि जाती मृत्युगृहा ।। पहा पहा त्या छताकडे । बघतां बघतां छाती धडधडे । ‘तुफान’ उसळे भयाण गाढे । प्रथमदर्शनी वाटेल ।। क्रोधायमान सागरी लाटा । स्वाहा कराया मानवी जीविता । काळचि विक्राळ फोफावता । सर्वसामर्थ्यें पुढे धांवे ।। रंगही तैसाच त्यांचा उग्र । राग–रंगाचा क्रूर तरंग । भग्न कराया मानवांग । काळ–ज्वाळा उफाळलीसे ।। भीषणतेची परमावधी । शिल्पित केली उमळी अवधी । नेत्र विस्फारती अगदी । थरकांप होई कायेचा ।। दृष्टि परि पुढे ढळवितां । पाउलांचे ठसे तत्त्वतां । मऊ वाळूवरील देखितां । चित्त होतसे भयमुक्त ।। ‘आहे कोणी आपुला वाली । देवचि धांवे संकटकाळीं । विश्वास हृदयाचिये तळीं । उत्पन्न होई निःशंक ।। विवेकरूपी विरक्तीनें । व्यतीत करावी अपुली जीवनें । तरीच शक्य भवांतुनि तरणे । सुटकेचा हा सुमार्ग पैं ।। जे का वागती अविकाने । त्यांचे कैंचे सफल जिणे ? । बोध त्यांतुनी हाच घ्यावा ।। सात्विकतेचा ठेवोनि भाव । युक्तीनें वल्हवा जीवित नाव । तरीच ते पैलतीरीचें गांव । मोक्षरूपी संभवते ।। पाउलांचे ते ओले ठसे । मानस अपुले फुलवीतसे । तारक रक्षक आहे कोणीसे । ऐसा विश्वास येई उरीं ।। की ते आशेचे नवपल्लव । उज्ज्वलतेची गोड लवलव । हैराण झालेला जो जीव । आशा–किरणीं नृत्य करी ।। विस्तृत वालुकामय किनारा । जेथें लाभे थारा निवारा । प्रगट होई बोध–धारा । छतावरल्या शिल्पांतुनी ।। ऐसा सुचला जो मतितार्थ । नमूद केला अन्वयार्थ । अन्य कांहीं परम–अर्थ । त्यांत अनुस्यूत असेलहि ।। जैसे की लोलकांतून । शिरतां केवळ एक किरण । सप्तरंगाचें लावण्यधन । अवचित लाभे नेत्रांसी ।। तैसे या शिल्पकृतींतून । दिसतील अर्थ भिन्नभिन्न । तें प्रेक्षकें घ्यावे समजावून । ज्ञानार्जनीं मन रमवावे ।।

—: ६ :—

क्रमांक सहा हें विहार–लेणें । दुमजली तें परमदेखणे । तंबोऱ्याचा सूर गुणगुणे । स्तंभ दोन वाजवितां ।। नृत्यांगण तेथें असेल पूर्वी । रचना गुंफेची हे सुचवी । सौख्यलहरी मानस नाचवी । निर्भेळ आनंद देवोनी ।। येथले सुंदर कलाकाम । गाळिला कलाकारें घाम । कलाकारांचे परिश्रम । प्रथमदर्शनीं उमगतात ।। कलाकार ते आध्यात्मोपासक । त्यांस न रागव्देष ठाऊक । बौद्ध–हिंदु हे पाईक । हीनयानांचे सुकृत्य हें ।। बुद्धाच्या सहा विशालाकृती । पीतवर्ण छान मूर्ती । काया अपुली रोमांचविती । विनम्र मानस होते पैं ।।

—: १० :—

क्रमांक दहाचे लेणींत । लेख काय तो असे बोलत । 'वशिष्ठपुत्रें केले व्दार अर्पित' । दर्शनी भागहि त्याचपरी ।। गजयोनींमधला जन्म । बुद्धकथा ती चित्रिली उत्तम । पाहतांच तें चित्रकर्म । येई घटना प्रत्ययास ।। पुढे बोधि वृक्षाचें सुरम्य चित्र । विश्व मानी जया पवित्र । वाहिलेल्या वस्तू अत्र-तत्र । लोंबती तरुच्या शाखांवरी ।। जिवन्त सोज्ज्वल आविष्कार । भासे वास्तव खरोखर । कां न सुखावे अंतर ? । विशुद्ध सात्विक तें दृश्य ।। तेथ मांगल्याचा अधिवास । तेथ पावित्र्याचां निवास । चंदन केशराचा जणूं उच्छ्वास । दैवी लीला सुनिश्चित ।। म्हणाल 'कशास्तव पुनरुक्ति ? । तेच तेच कशाप्रती ? । जरी पुसेल कोणीं मजप्रती । तरी त्यामधें तथ्य नसे ।। जरी भासते दुरोनि सारखे । तरी त्यांत नाविन्य नेमकें । शव्दकळा न वर्णूं शके । बारकावा इतुका कमालीचा ।। सांप्रत तेथल्या चित्रांना । कांचेच्या बसविले आवरणांना । दशरथ–जातक कथा दिसे नेत्रांना । नक्षी त्यांतली आल्हादक ।।

—: १६ :—

पूर्णेंदूची सोळावी कला । तैशीच ही लेणी क्रमांकें सोळा । लेख येथें सुरस आगळा । "वाकाटकादिकांचा" उल्लेख ।। (एके चित्रीं) भिक्षु

दिसती निद्रावस्थेंत । वन्यपशू चरण चाटीत । अश्व शेजारीच चरत । परमशान्तीचें द्योतक तें ।।

नंद-राज्ञी सौंदर्यवन्त । कां हो ती झालीसे मूर्च्छित ? । नंदराजाचा बघतांचि मुकुट । दुःखभावना सर्वांगीं ।। दासी, सख्या, साऱ्याजणी । शांतविण्या करिती समजावणी । परी तिचा तीव्र दुःखाग्नी । कांहीं केल्या शमेचिना ।। नंदराजा निर्धारानें । बुद्धानुयायी स्वतः बने । त्याग सर्वस्वाचा त्यानें । उच्च ध्येयार्थ केलासे ।। घेई नंद संन्यासदीक्षा । बुद्धदर्शनाची तया आकांक्षा । वैभव–त्यागाविना अपेक्षा । कैसी सफलती होणार ? ।। ऐशियापरी नृप (बने) निरासक्त । भोगविलासाघासोनि अलिप्त । राजस्त्री परि बहु आसक्त । घळघळ गाळी अश्रूंना ।। अंग टाकिलें धरणीवर । शोकाकुल ती झाली अपार । वस्त्रेभूषणें अलंकार । शुद्ध कशाची नसे तिला ।। नेत्रांमाजी दुःखार्तता । भंगकरी सारी शान्तता । पतिप्रेमाची उत्कटता । मूर्तिमंत ती उफाळणारी ।। एक मन धावे त्यागाकडे । दुजे मन तें भोगाकडे । भोगा अभावी अतीव कुढे । दुःख होतसे अमर्याद ।। त्यागामधला परमानंद । चाखण्या राजा उद्युक्त नंद । राजस्त्रीचा विलासछंद । भोगान्मुख की झालेला ।। नृपाची ओढ शाश्वताकडे । बुद्धाकर्षण अंगी जडे । आसक्तीच्या लोभापुढे । थांबेना तो क्षणमात्र ।। विचारप्रवर्तक प्रसंगचित्रे । रंगत्रियली जणु सुरंग-मंत्रें । प्रमावाने अपुली अंतरें । थक्कचि होती साश्चर्ये ।। ठळक ठळक दृश्ये पाहूं । चित्रकुंजात यथेच्छ विहरू । आस्वाद त्यांचा नयनें चाखूं । मधाळ पोळें जणू इथें ।। सिंहासनस्थ बुद्ध एकेठायीं । प्रवचन त्याचें दृश्य दाखवी । शान्तिभावना आंतबाहेरी । तेज विलसते मुखावरी ।। श्रोतृवृंदांचा अपार मेळा । उपदेश करी बुद्ध त्यांजला । पूर्णामृताचा स्रोत आगळा । वर्षे येथें पूर्णत्वें ।। बुद्धाची गंभीर मुखचर्या । तेज चढवी रूपसौंदर्या । परते सारी चंद्रसूर्या । उजळवी मति सकलांची ।। शाश्वत तत्त्वांचें निरूपण । जेणें होई सत्य आकलन । सोपपत्तिक तें विवरण । बुद्धकरी सर्वदाच ।। झटकितां किल्मिषांची कोळीष्टकें । ज्ञानरवीचा प्रकाश फांके । मोक्षमार्गाचें तें निके । दर्शन देई दृष्टीपथा ।। द्वितीय क्रमांकाचे लेणींत ।

बुद्धकथा जी झाली खंडित । ती येथें असे सुरूं होत । बालबुद्धाचे जीवनाची ।। मायावतीचा स्वप्नसोहळा । रत्नमण्यांचेपरी गुंफिला । हर्षे तेणें जीव आपुला । पुण्यदर्शनाचें भाग्य मिळे ।। गौतमा भरविला जाई दूधभात । वात्सल्य चित्रांकित मूर्तिमंत । सुगंध पसरे मनोमंदिरांत । शैशव स्मरते प्रत्येका ।। गुरु " असित " गौतमा शिकविती । धनुर्विद्या यथार्थत्वें ती । काय दृश्य आहे पुढती । पाहूं सुरेख भव्योत्कट ।। शेतामाजीं शेतकरी । बैलां-प्रती ताडण करी । चित्र तें अतिशोककारी । गौतम गजबजे दुःखानें ।। अनेक प्रसंग ऐसे जीवनीं । बघतांबघतां रात्रंदिनी । गौतम विव्हळे अंतःकरणीं । दुःखातिशयें तो शोककरी ।। पाहोनिया बास्तवजीवन । कळवळे त्याचें अंतःकरण । लाभण्यास्तव उदात्त जीवन । महानिश्चय गौतमें केला असे ।। वैराग्य आले ' युवराजाला ' । पोहोचे तो परित्याग-दशेला । राज्यपसारा तयें त्यागिला । विजनवासीं अन् बनला ।। कांता–पुत्राचें गोड दर्शन । तरी न होई विचलित मन । ऐसे अनन्यसाधारण । विरक्तपण तें अलौकिक ।। चित्र तें सुंदर लोभसवाणे । जीवनक्रान्तीचें गाई गाणें । कांही आहे तया सांगणे । कुतूहल वाटे सर्वांना ।। प्रसंगचित्र रेखाटणे हुबेहुब । कलाकर्म हें खचित अजब । चित्र दावितां म्हणाल "अबब" । कैसे रेखिले असेल बरे ? ।।

युवराजाची मिरवणूक । ज्यांत सामील सैनिकपथक । हत्ती घोडे रथही देख । अलंकारें नटवियले ।। थाटमाट भव्य त्यांतला । भारदस्तपणा आगळावेगळा । वैभवाचा फुलता मळा । संपन्नतेनें शोभतसे ।। नाना वाद्यें आणि वादक । नृत्य करिती कोणी नर्तक । भव्य थाट तेथें देख । हृदय बहरवी मोदानें ।।

—: १७ :—

चंद्राची जैसी ' सत्रावी कला ' । ' राशिचक्र ' वदती या गुंफेला । अष्टभाग असती या चक्राला । अंगोपांगे जीवनाची ।। प्रबल नीतीचे पाया-वर । असावा अवघा उभा संसार । धागा अनुस्यूत सुंदर । विशाल उज्ज्वल

दर्शन हें ।। लोकजीवनाचें चित्रण । यथातथ्य तें केले जाण । तत्कालीन स्थितीचे 'मान' । समजें सुस्पष्ट निमिषांत ।। श्रमजीवी वर्गाचें चित्रण । आनंदाची सांठवण । तत्कालीन स्थितीची आठवण । इतिहासचि तो उभा ठाके ।। वस्तू, पदार्थ, पोषाख सुंदर । अलंकार, हत्यारें, अवजार । चालीरीती, आहार, आचार । संस्कृति-विचार स्पष्ट होई ।। घरें, दारें, प्रासाद, वाडे । शेतें, गुरें, दृष्टीपुढे । ज्यामधें प्रतिबिंब पडे । तत्कालीन हो जीवनाचें ।। साधेपणा असे खेडयांत । वैभव नांदे राजवाडयांत । झाले सारे चित्रांकित । प्रत्यया येई हुबेहुब ।। निरखितां चित्रें स्त्रीपुरुषांची । कल्पना येई वेषभूषेंची । तैशीच ती केशभूषेची । प्रकार नाना भिन्नभिन्न ।। पुरुष वापरीत 'अर्धोसक' । तुमान, मांडचोळणा सुबक । उत्तरीय वस्त्र कोणी निर्धोक । जानव्यापरी परिधानी ।। विकच्छ पद्धतीनें स्त्रिया । नेमत सुंदर सुरेख साडया । उरोज ते झांकावया । वस्त्रपट्टी उपयोजीत ।। नाना तऱ्हांच्या केशरचना । कौशल्यानें करिती ललना । लेववितीं अन् शिरोभूषणा । प्रकार सुंदर नानाविध ।। मोत्यांचे लोंबते केयूर । सोनपुतळियांचे हार । कुंडलें कानीं मनोहर । मोत्यांचे सर कंठांत ।। ऐशिया भूषणांनी मुखमडळ । शोभुनि दिसे रम्य विलोल । प्रमदांची ती हालचाल । मोहकतेनें झगमगते ।। कित्येक आहेत समूहदृश्यें । नाना देशींचे लोक तैसे । अन्य प्रांतीय लोकहि आपैसे । दृश्यमान हो तयांमधे ।। परस्परांचे संबंध । प्रेमळपणाचे अनुबंध । जीवनप्रवाह एकसंघ । वर्तणाग दिसत असे ।।

प्राणीही बोलके पशुही बोलके ।
सारेचि बोलके चित्रांमाजी ।।

स्त्रीपुरुष वा बालकें । चेहरे उत्कट बोलके । भाव-प्रभेचे तेज फांके । करी प्रभावित मानस पै ।।

ओठ ते बोलके नेत्र ते बोलके
वेधिती सारखे चित्तालागी
रहाल जर मुके व्हाल की बोलके
असाल बोलके तटस्थ व्हाल

प्रवेशद्वाराचिये लगत । चित्र एक करी स्वागत । हृदयाचा की ठाव घेत । आनंद लाटा उठतात ।। गंधर्वांचें उडते पथक । ज्यांत गायिका स्त्रिया नाजुक । गायनाची लकेर देख । मुखामधोनी पहा स्रवे ।। नाना सुमनें सुंदर शिरीं । एक धरी मुरली अधरी । तन्मयता ती अंतर्बाहिरी । भाव सुखाचा अनामिक ।। उडत्या बसनांच्या चुण्या । सुस्पष्ट सुरंगी देखण्या । तलम वस्त्रांनी वेढिले नाना । शोभती अंगी नेटकेपणे ।। अर्धोन्मीलित नेत्र सुंदर । तेही घेती जणूं लकेर । मेघमंडलांतून संचार । रमणीय त्यांचा गमे किती ।। दुरोनि वाटते गातसे कातळ । दुरोनि वाटते नाचतो कातळ । दुरोनि वाटते बोलतो कातळ । अनामिक ऐशा बोलीत ।। एवढें एकुलें चित्र जरी देखिले । कौशल्य जेथें ओथंबले । वाटते नेत्रांचे पारणे फिटले । स्मरण-मंजुषी चित्र वसे ।। पडवीबाहेर एक लेख । "अश्मक" राजाचा त्यांत उल्लेख । खचित थोर तो रसिक । आश्रय ज्याचा कलाकारां ।। अवलेकितेश्वराचा शांतीपाठ । चित्राचा त्या सुंदर थाट । बुद्ध देई आशिर्वाद । बोधिवृक्षाचे शेजारी ।। धनपति कुबेराचे पुतळे । कमानीमाजी कोरियले । उणे नसेल कांही पडले । म्हणोनीच हो कलाकारां ।।

"वेस्संतर" जातक-कथा भाग । सांगे बोधिसत्त्वाचा देशत्याग । पुत्रांचा तो करी त्याग । ब्राम्हणार्पण करी सकलांते ।। इन्द्रकृपा लाभतां तयास । संपला सारा दैवदुर्विलास । पुत्रधन लाभले पुन्हा त्यास । राजलक्ष्मीसमवेत ।। "महाजन" जातककथेचा विषय । चित्रीं दिग्दर्शयिला आशय । राजकन्येचा होई निरुपाय । वशीकरण तंत्र विफल घडे ।। सिंहलीची अमूप धडपड । चळवूं न शके बोधिसत्त्वाचे तत्त्व-गा ड । तपस्याच तशीं अहो प्रगाढ । विरक्तविषया पासोनी ।। जे का असती साधुसज्जन । त्यांप्रत साह्यभूत भगवान । कोणतेही रूप घेऊन । धावतो पावतो ईश स्वयें ।। समुद्रपर्यटन प्रसंगी । बुडती नौका बोधिसत्त्वालागी । मणिमेखल यक्षें तारिलें जगीं । दृश्य तें रेखिले सुरंगात ।। हत्तींची ती मिरवणूक । गमते खचित अलौकिक । चित्रकलेचेंच कौतुक । करावेसे वाटतसे ।।

तन्वंगीचें प्रसाधनगृह । वस्त्रभूषणांनी सजवी देह । ऐन्यामाजी सखी सह । नटवी तनू कोमलांगी ।। नाजुकसुंदर अवयव । दाविती पाहे आगळा भाव । देखणेपणाचे की पल्लव । मनोहर रूपा दर्शविती ।। कामिनीची तल्लीनता । चित्रास आणी सजीवता । चित्र हें खुलवितां रंगवितां । चित्रकार असतील दंग झाले ।। शृंगारभावनेचें लाघव । चित्रीं रंगविणे वास्तव । कलाकर्म हें असे अभिनव । संयमशील खचित असे ।। चातुर्यास्पद ती अंखणी । यथातथ्य सुबक मांडणी । चित्रामाजी ही गुंफणी । सहजोत्कटता फुलविणारी ।। बुद्धप्रतिमा उभी अिथे ती । महन्मांगल्याची आकृती । दिव्य तेजाची ती झगमगती । प्रतिमा ओजस्वी साजे ।। पत्नी 'यशोधरा' पुत्र 'राहुल' । उभे पुढती होउनी आकुल । 'मागणे' कांहीं मागती निस्तुल । भाव दिसतो मुखांवरी ।। बुद्धानें त्या पुनरपि यावे । राज्यसंसारीं सुखें नांदावे । राहुलास वाटावे अन् बरवे । असेल हेतु दोघांचा ।। 'ऐसे विचार म्हणजे क्षुद्र गोष्टी । महत्तम आहे आध्यात्मसृष्टी । पुनरपि होण्य साठी कष्टी । काय 'मुक्त' तो परतेल ?' ।। जेणे आत्मकल्याण साधिलें । आणि विश्व तें मोहरें लाविलें । काय तो धर्मात्मा मागुती वळे ? । दृढनिश्चयाचा तो महामेरू ।। अमृतदृष्टीचें अवलोकन । बुद्धाचे ते पवित्र लोचन । कारुण्याचा सिंधु पूर्ण । उचंबळलासे सर्वांगें ।। अभयवृत्ति उदारबृत्ती । उद्धाराची तळमळ जागती । पावित्र्यानें चित्तवृत्ती । प्रेक्षकांचीहि फुलते की ।। ऐसे हें प्रख्यात सुचित्र । बघतां केवळ क्षणमात्र । अज्ञानाची सरोनि रात्र । ज्ञानप्रभात फटफटते ।। एकाच अहो चित्रांतून । घडवी जो का मांगल्य–दर्शन । त्यांचे धरावे खचित चरण । आणिक त्रिवार वंदावे ।। पुण्यात्म्याचें तें दर्शन । हृदया पटवी आत्मखूण । किती हो म्यां वानावे ऋण । चित्रकारांचे येथे ? ।। चैतन्याचा लाभुनि स्त्रोत । उल्हासानें मन बहरत । सुमार्गदर्शक प्रकाशझोत । जणों सर्वत्र पसरलासे ।। कमळ सुंदर तें उमलावे । चन्द्रबिंब वा तें उगवावे । आम्रतरूला पल्लव फुटावे । तैसे मनोज्ञ हें चित्र ।।

—: १९ :—

एकोणीसावी चैत्यलेणी छान । स्तूपावरती छत्र्या तीन । "स्वर्ग-

मृत्यु–चिरस्वातंत्र्य " दर्शन । मध्यकमानींत उभी बुद्धमूर्ति ॥ या लेणीस म्हणती "गंधकुटी" । शिल्पें, चित्रें, सुंदर गोमटी । करावी किती त्यांची लुटी । नेत्र म्हणती मनाप्रती ॥ स्तभावरी पुष्पदलांचे आकार । वेलफुलींच्या वेलबुट्टया दळदार । उडत्या आकृत्यादि सुंदर । हत्तीघोडेस्वार बकरेही ॥ बुद्धाचे मुखवटे अनेक । डावे बाजूस कुबेर मोहक । सिताफळें, द्राक्षें मन-मोहक । शिल्पांकन तें सुंदरसे ॥ म्हणती कुणी या लेणीस "शिल्पभांडार" । कलाकुसरीचें वा आगर । किंवा कल्पनांचा मूर्त सागर । येथे जणूं उचंबळलासे ॥

—: २० :—

पाहू जातां लेणें विसावें । जीव खचित हो विसावें । " मच्छिद्र' पुतळयास पहावे । प्रत्येकस्तंभी त्रिलोकदर्शन ॥ नागराजाचेही घडे दर्शन । मन हें अपुलें होई पावन । करावे वाटे मूर्तिस्तवन । मानस फुलते स्वानंदें॥

—: २१ :—

एकविसाव्या लेणींत । आसनस्थ बुद्ध उपदेशोद्युक्त । प्रभांवशाली व्यक्तिमत्व । भावदर्शन आदर्श तें ॥ हजारो वर्षांमागील रंग । ताजेतवाने त्याचे तरंग । आनंदांत मानस दंग । टवटवीत सारे चैतन्यमय ॥

—: २२ :—

बाविसावे लेणींत । बुद्ध देखा तो ध्यानस्थ । एक लेख कोरिला तेथ । आशय त्याचा ऐका तो ॥ "सौंदर्य-समृद्धि-सद्‌गुण । ओजस्वी इंद्रियें, ज्ञानवर्धन । लाभावे ते सकलां जाण । संथोष व्हावा नेत्रांना ॥ उदात्त हेतू हा वाचून । कौतुक मनास वाटे जाण । आणिक वाटे अभिमान । समाज-हितैषि पूर्वजांचा ॥

—: २३ :—

तेविसावी लेणी पहारे । दो बाजूंना भजनमंदिरें । मानस तेणें खूप मोहरे । कुसर पहा ती रंगमय ॥ विशिष्ट हेतू प्रत्यक शिल्पाचा । तैसाचि

प्रत्येक चित्राचा । पडताळा तो घेवोनि साचा । नंतर निर्मिति झाली से ।। तथापि न तेथें कृत्रिमता । उत्कट सर्वत्र सहजता । वेधक ऐशी आकर्षकता । समरस होई प्रेक्षक पै ।।

—: २६ :—

आनंद-शोक या दोन्ही भावना । सविलासात्रे लेणींत दिसती नयनां । जेणें वेढिले असे जीवना । प्रत्यक्ष पाहू या आतां ।।

मृत्युलोक हा जितुका भाग्यवन्त । तितुकाच आहे अभाग्यवन्त । स्वर्गीचे तो खेची 'पुण्यवन्त'। परी न ते लाभती सर्वकाळ ।। कार्य संपल्या-नियागें । गमन करिती योगमार्गे । सामान्यजन ते दुःखयोगें । अपार होती व्याकुळ पै ।। अवतार समाप्तीचा त्यांना आनंद । परि जनांस वाटे अपार खेद । अश्रुप्रवाह अनिर्बंध । घळघळ नेत्रांतुनि वाहे ।। 'गोरखपुरासमीप' 'कुसीनार'। त्याची दिशा जी उत्तर । 'गंडक' सरितेचा परिसर । तेथें घडला दुःखप्रसंग ।। सालवृक्षामोजी आडवी । टाकिलीसे चौपाई । त्यावर निजले बुद्ध यतिजी । उठलेच नाहींत पुन्हा कधी ।। आत्मज्योति स्वर्गी गेली । तेथ सुर-मंडळी हर्षावली । परन्तु अहो या भूतळीं । प्रचंड आक्रांत माजलासे ।। चित्र तें दुःखार्णवाचें । मानवाच्या शोकाकुलतेचें । रेखियलें यथातथ्य साचे । पाहतां गजबज हो हृदयीं ।। मृत्युलोक असतां दुःखार्णवीं । स्वर्गासि मात्र झाली पर्वणी । 'पुण्यवन्त' परतला म्हणोनी । देवेंद्रहि तो आनंदला ।। तेंहि दृश्य यथातथ्य । चित्रकारांची करामत । भाव कैसे रंग-विले तेथ । अजब त्यांचे सर्वगामित्व ।। रूप बुद्धाचें गोमटे । गाढ निद्रा लागली वाटे । निर्वाण-दृश्य हें मुळी न पटे । प्रसन्न बघतां मुखमुद्रा ।। सज्जनांचें कलेवर । कधी न वाटे ते भेसुर । परमामृताचे पांझर । नेत्रां-मधुनी पाझरती ।। स्तूपावरील कोरीव काम । घडली ज्याची अत्युत्तम । भव्यता बघतां एकदम । मानस भरते भव्यत्वें ।। दक्षिणभागीं जे का स्तंभ । त्यांवर बालकाचें चित्र-बिंब । कोठुनीहि पाहतां अविलंब । बघते बालक आपणांकडे ।। वदनावरला तो गोडवा । वाटे करावा त्याचा हेवा आठवोनिया आपूल्या शैशवा । मानस पावन होताहे ।। पहा कैसा योगायोग । एकेच ठायीं

भिन्न प्रसंग । 'बुद्धनिर्वाण' पोळी अंग । चालक मानस शांत करी ।। क्रमांक एकचे लेणींत । जो हो निवेदिली प्रसंग-मात । तें चित्र आहे पहा येथ । किंचित् वर्णन तें ऐका ।। 'मां?' राक्षस दुष्टनीच । करोनि तेणें कारस्थान-प्रपंच । घातला संकटांचा नंगानाच । बुद्धाचिया तपोमार्गी ।। सहाय्य पुत्रींचे घेवोनी । धडपड केली रात्रंदिनी । पराभव झाला परि तत्क्षणी । प्रसंग पूर्वी निवेदिला ।। शुद्धनिर्मळ ज्याचें मन । त्यास कसले संकट-विघ्न ? । उठोनि दिसते देवपण । ऐशा समयीं तर त्याचे ! ।। जो या लेणीमाजी आहे । लेख आपणां सांगताहे । "भिक्षुभदंत गुणाकरें" । देणगी दिधली परमादरें ।। दया-प्रकाश लाभण्यालागी । प्रत्येक प्रत्येक सुगतालागी । "नवाब्धिवार्ये" बांधि? हें पाही । लेख दुसरा सां?ताहे ।।

—: ३० :—

क्रमांक तींसचे लेणींतून । करितां दरीचें अवलोकन । अश्वटापेचीच खूण । जणूं वाटते आपणांला ।। दृश्य सुंदर हृदयंगम । निसर्गशोभा ती अप्रतीम । हरखोनि जाती सकलजन । ताजे?वान वाटतसे ।।

याहूनही आणखी लेणी । संशोधियल्या सांप्रत कुणी ।
सौन्दर्यवंत आंतील मांडणी । यथावकाश ज्ञात होईलचि ।।

जेथें कला आहे विशेष । ऐशाच लेणीं न्याहाळिल्या विशेष । कलेचा तेवि महत्वांश । वरती केवळ निवेदिला ।। अन्य ज्या ज्या असती लेणी । त्याहि ध्याव्यात खचित पाहोनी । "विशिष्ट" लेणी देखा म्हणोनी । कैसे तुम्हां सांगावे ? ।।

केवढा प्रचंड येथला प्रकल्प । कल्पनांचा जो संकल्प । मती जरी आपुली अत्यल्प । रचनेतिहास जाणूं कल्पनेनें ।। म्हणेल कोणी ऐसे खास । की कशास करणें कल्पनाविलास ? । लेणींच्या रचनेचा इतिहास । कल्पनेने कैसा उलगडणे ? ।। ऐशिया तऱ्हेच्या प्रश्नास । द्यावे काय उत्तरास ? । परमरमणीय कल्पनाविलास । काय नोहे मोदप्रद ? ।। सत्यसशोधनाची ती रीती । ज्यांतुनि कांहीं गवसेल हातीं । कां मग दवडावी म्यां ती ? । कथन करितों अवधारा :— ।।

'येइल मोहर याला बहर फळांचा मधुर मधुर खास'
बोले ऐसे कोणी आम्रतरूच्या समोर मित्रास ।।
'येइल येथे कोकिळ फुटेल स्वर तत्सुरेल कंठास'
बोले ऐसे कोणी आम्रतरूच्या समोर मित्रास ।।
'छाया शीतल शीतल गमेल सकलां अपार उल्हास'
बोले ऐसे कोणी आम्रतरूच्या समोर मित्रास ।।
'परिमल चित्ताकर्षक जगतीं द्विगुणित करील सौख्यास'
बोले ऐसे कोणी आम्रतरूच्या समोर मित्रास ।।
'समूळ निरसुनि दुःखें परमाल्हादक गमेल हृदयास'
बोले ऐसे कोणी आम्रतरूच्या समोर मित्रास ।।
'शीण सर्वही हरला बोलांनीं तव अमृतमय खास'
बोले ऐसे कोणी आम्रतरूच्या समोर मित्रास ।।

होता तेथें बसला भिक्षु बाजुला कोणी ध्यानास
तोही डोलूं लागे ऐकुनि सुंदर वरील वचनांस ।।
हृदयीं स्फुरलें कांही भव्यदिव्य जणुं त्या शुभसमयास
स्वगत चला तर ऐकूं, तोष जयानें घडेल हृदयास
'आम्रतरूसम शान्ती लाभ तियेचा जनांस होण्यास
गुंफा-लेणी कोरिन होइल जेथें सुतत्त्व-अधिवास ।।
सारे शक्य असे या जगतामाजी मनुष्यमात्रास
'प्रयत्न' साधन करितां देवहि धावुनि येइ सहाय्यास' ।।

भिक्षूंना मग पाचारोनी । कल्पना अपुल्या निवेदोनी । म्हणे निर्मूं गुंफा-लेणी । इये पर्वताचिये ठायीं ।।

चैत्यमदिरें आणि विहार । सुंदर निर्मूं ऐसा विचार । बुद्धदेवाचे चरित्र थोर । रेखाटूं रंगवूं अंतर्भागीं ।। महन् तत्त्वांचें जे सार । त्यास म्हणती 'बुद्धविचार' । रेखाटण्याचा करूं निर्धार । प्रभावी माध्यम हें सांचे ।। होईल तत्त्व-गुंजारव । धर्मचर्चेंतून अभिनव । श्रीबुद्धाचा अन् आठव । आपोआपचि तद्योगें ।। पिढयान् पिढयांना मग हें स्थान । प्रदान करील

समाधान । मनन चिंतन योगें करून । ज्ञानप्रकाश लाभेल ।। जीवन म्हणजे काय भोग ? । भोगामाजी भीषण रोग । जमणार केव्हां विवेक-योग ? । हेचि कळेना कुणाप्रती ।। 'कैसे सांगावे ? कैसे शिकवावे ? । दुर्दैव येई काय आडवे ? । आपण आपुल्या मार्गें वर्तावे । हेचि मजप्रती गमे बरे' ।। हवेच बोधणे अज्ञ-जनां । बुद्ध महात्म्याचीच आज्ञा । केली असे जी प्रतिज्ञा । कदापिहि त्यजूं नये ।। गुंफांचिया दालनांतून । शिल्पचित्रांच्या माध्यमांतून । विशद करूं या तत्त्वज्ञान । अभिनव वेधक बनेल जें ।। 'अहो या घनघोर संसार-सागरांत । आत्मशांत्यर्थ स्थान असावें शाश्वत । जेणेंम नवाचें चित्त । सुखास्पदता पावेल ।। 'परमशान्तीचा लाभण्या ठेवा । उपाय कांहीं निर्माण व्हावा । यावे या लेण्यांचिया गांवा । आणि लुटावा आनंद ।। नाना व्यथा नाना कथा । जनांच्या नशिबी दुःखवार्ता । अंशमात्रें त्या निस्तरण्याकरिता । पाहिजेच प्रकल्प संकल्पिला ।। संकल्पिलेलें सिद्धीस जातां । सुयोग्य फळ मग येईल हातां । युगांयुगांसाठी तत्त्वतां । उपयोगा तें येईल ।। नोहे मार्ग हा निष्कंटक । अथवा सपूर्ण की निर्धोक । जागोजाग धोके देख । गांजिती षड्रिपु एकसारिखे ।। 'मार' राक्षसाची कथा । तैसी इंद्राचीहि कथा । आहेच ठावी अपुल्या चित्तां । निश्चलवृत्ती अंगीं हवी ।। सकल दुःखांना पचवून । दिव्य ज्ञान प्राप्त करून । जनां तारण्या भवाब्धींतून । बुद्ध निरंतर कटिबद्ध ।। शान्ततेचा ती आकांक्षा । सत्य अहिंसादिक त्या मनीषा । पूर्ण करण्यासाठी ईर्षा । तळमळ प्रचंड बुद्धमनीं' ।।

तेजस्वी हें भाषण जरी । कांहीं भरले मात्सर्यें उरीं । नच जाणोनि विचार-थोरी । काय म्हणती ते ऐका :– ।।

कुणी वदले–'या डोंगरांमध्ये रे
दगड धोंड्यांच्या वीण काय ते रे ?
तुच्छतेनें पाहोनि हसुनि त्यातें
निघुनि गेले ते आपुल्याच पंथें ।।

परि ती भिक्षू धैर्यवन्त । किल्मिष नोहे अंतरांत । करोनि अन् मंद-स्मित । वदला विनये संघाप्रति ।।

'अहो ! पर्वत सौंदर्य निर्मिणारे !
अहो ! पर्वत औदार्य उधळणारे !
अहो ! पर्वत सुखशान्ति निर्मिणारे !
अहो ! पर्वत विश्वांत शोभणारे ॥

हेच पर्वत मेघांसि अडविणारे
हेच पर्वत पवनास फुलविणारे
हेच पर्वत धबधबे निर्मिणारे
हेच पर्वत नवझरे झरविणारे ॥

हेच पर्वत भांडार वैभवाचे
जणू की हे कोठार निसर्गाचें
ज्यांत खनिजांचे कोष तऱ्हतऱ्हेचे
स्थान हें तर हो देवदेवतांचें ॥

जाण नाही ज्यां क्षुद्र वृत्ति ज्यांची
मूर्ख समजावी मती पामरांची
बुद्ध देवा ! द्या सहाय्या अम्हांते
करा निष्कासन दुष्ट भावनांचे ॥

हे नव्हेत डोंगर लोंगर सौन्दर्याचे !
सौख्याचे सागर आगर रम्यत्वाचे !
रंगाने हिरव्या सजला डोंगर सारा
वर नील नभाचा अवघा शान्त पसारा ॥

तरुराजी नटली फलभारें सुमनांनीं
ओढणी घेतली पानांची वेलींनी
आरोळी देतां घुमते रानोमाळी
येतसे प्रतिध्वनि दरीदरींतुनि उरळी ॥

छेडितो तार वीणेची जणुं तो वारा
मधुनीच नाद निघतसे मधुर अति प्यारा

अन् सळसळ होई नाजुक पानोपानीं
दरवळे गंध स्वच्छंदे उसळत विपिनीं ॥

घ्या अंगावर वाऱ्याच्या शीतल झुळुका
उत्तुंग शिखर हें बघा नेत्रसुख चाखा
स्रवतात झुळझुळू स्त्रोत मधुर सलिलाचे
जळ किरणीं खेळे निळसर अवखळ नाचे ॥

अंगावर मिरवे वस्त्र भरजरी हिरवे
हे डोंगर डुलती मनांत अपुल्या बरवे
पक्ष्यांचे उडती थवेच जिकडे तिकडे
संगीत शिंपिती त्यांचे मंगल मुखडे ॥

बाराही महिने क्षणोक्षणी नाविन्य
कधि सूक्ष्म तरल कधि स्थूल नवें लावण्य
लावण्य पाझरे वाटे त्यांच्या मधुनी
चैतन्य झळाळें घ्या घ्या ते पाहोनी ॥

होवोनी उत्सुक आणि वाट चालोनी
चांदण्या, चंद्र निशि बघती डोकावोनी
दिनरात गिरी हा पुकारितो सर्वांना
निःशब्द वचांतुनि बोले 'या हो या ना ! !'

सकल गुणगाथा काय उगा मांडू ?
त्यांत अपुला मी समय किती दवडू ?
पर्वताचें महिमान थोर गातां
परम सौख्याचा लाभ होइ चित्ता ॥

पर्वतानें वर भार पेललेला
कातळाचा मध्येंच थोर 'भेला'
त्यास फोडुनि कोरोनि हवे तैसे
उचित घडवूं या 'शिल्प' थोर हौसें ॥

नाविन्य सद्विचारांतील ऐकून । उचंबळले अंतःकरण । सकलां वाटे समाधान । सुकल्पना ती ऐकोनी ।। कोणी एका वृद्ध भिक्षूनें । म्हणितले काय आनंदाने । 'हे तो वसन्ताचें बोलणे' । प्रतिभावन्ता ! तुझें असे' ।। 'कोजागिरीचे की हे चांदणें । नटले काय सुवर्णगुणें ? । सुमनांचा की परिमल येणें । वक्तव्यीं या उधळियला ? । 'याचिया बोलांचा प्रत्यय । येईल पुढती' वदे भविष्य । केवळ नव्हे रे अभिनय । तळमळ तुडूंब हृद-यांत ।। नका लावूं आतां विलंब । झटकोनि टाका आळस-दंभ । कराल सत्कर्म जितुके अविलंब । आत्मोद्धार होईल तयें ।। पटवुनी देऊ नृपांप्रती । जें जे आहेत सांप्रती । पुढेही जे जे होणं असती । अखंडपणे हे चालावे ।। कलाकारांपुढती । योगक्षेमाची नकोच भ्रान्ती । ऐसी व्यवस्था आवश्यकती । करोनि ठेऊं कांहींतरी' ।

अचल त्यांच्या मग ध्यानिं-मनीं-स्वप्नीं
येउं लागे निशिदिनी कसा सजुनी
म्हणे—'कोरा रे कृष्णप्रस्तराला
आणि निर्मा रे चैत्य-विहाराला' ।।

नका कोणी घावरू बावरू रे
तुम्हांपाठीशी मीच की उभा रे
कसब लावा रे कलेचें पणाला
आणि निर्मा सौंदर्य-वैभवाला ।।

नका शंकू की मजसि खोदितां रे
काय जाइल ते खचूनि शीर्षभारे ?
करा परिसीमा कलेची इथे रे
धरिन पोटाशी प्रेमभरे सारे ।।

अचल नामें मी ख्यात तुम्हां ठावे
भार अवघा मी पेलितों स्वभावें

झीज घडतांही अंतरीफुलेन
'चंदनाचें' त्या स्मरण मी करीन ।।

सज्जनांचा गुण तया प्राप्त झाला
अंश तरि मी पाहिजे व्यक्त केला"
तळमळीनें बोलला गिरी कांहीं
असे आवाहन नित्य करित राही ।।

कधी दावी तो पुष्पपर्णमाला
कधी दावी निर्झराच्याच लीला
कधीं दावी तो धवल धबधब्याला
इन्द्रधनुच्या अन् कधी रंग-लीला ।।

विविध पक्ष्यांचे थवे कधी दावी
मंजु कूजन तें ऐकवी प्रभावी
अशीं दृश्यें अतिरम्य ढंगदार
अचल दावी स्वप्नांत रंगदार ।।

मुग्ध झाले ते भिक्षु तेथ सारे
लुब्ध झाले ते भिक्षु-भृंग सारे
कलाकारांच्या चित्ति भरे वारें
स्फुरण चढलें चैतन्ययुक्त न्यारें ।।

"नगाला" त्या मग सर्वही म्हणाले-
'अम्हांला रे त्वां खचित जागवीले'
घेइ वंदन हें आमुचें त्रिवार
असो आशिर्वच तुझें रे अपार ।।

तुझ्या साह्याविण शक्य नसे कांहीं
नित्य पाठीशी वसत असो ग्वाही
पर्वताला मग थोर मोद झाला
मूक शब्दें तो तये प्रकट केला :- ।।

अजस्त्र आहे तुमची शक्ती
अपार आहे तुमची भक्ती
त्याच बळावर कळिकाळाचे डाव करूं या फोल ॥ धृ ॥

भगीरथानें स्वर्गंगाला
भिडवियले की या धरणीला
प्रयत्नरूपी इतिहासाचें स्मरुं या पर्व विलोल ॥ धृ ॥

शान्तिब्रम्ह ती बुद्ध स्मरूं या
चित्रांकित तत्कथा करूं या
गुंफांमाजी आणि जडवुं या वैभव तें अनमोल ॥ धृ ॥

त्या बुद्धाच्या आठवणींनी
प्रेमा उसळे अंतःकरणीं
मरण–भयाची वार्ता नुरते मन बनते चंडोल ॥ धृ ॥

कार्य असे हें जीवनभरचें
निर्धारानें करावयाचें
चंचलतेचा मात्र निसरडा सांभाळा ' हिंदोल ' ॥ धृ ॥

सुरेख शिल्पें सुडौल मूर्ती
चित्रांची तर नवी निर्मिती
काळा कातळ सुंदर करुं जैं मानस घेइल डोल ॥ धृ ॥

मर्त्य जरी ही काया अपुली
अमर परी हो कलाच सगळी
युगे युगे रे इथे वर्षातिल परम स्तुतीचे बोल ॥ धृ ॥

क्षयी चंद्र होई क्रमानेक्रमानें
परी अक्षयी शिल्पचित्रादि जाणे
जरी भावि काळी नसूं पाहण्यातें
तरी आजला अंतरीं मोद वाटे ॥

प्रतिपळ होवोनिया सचेतन निरखित होता किमया
किती कुतूहल असेल वाटत त्याला तत्समया

शतावधी तेवती जशा त्या कांचनमय समया
तसेच दिसलें दृश्य मनोरम नवलचि ये उदया
दुःखें सारीं दूर पळोनी गेली हो विलया
उपकारचि ते सकलांवरती ती तर बुद्ध–दया

धांवत होता काळ सारखा भरभरभर पुढती
संपुनि खणती गुंफा बनल्या थोर घडे प्रगती

आकाराला आले कांहीं होते दिव्य नवें
क्रमाक्रमानें कलाकारही होते जन्मत नवे
सुरूच होते कार्य तेथलें पूर्वनियोजित भलें
काय म्हणे तो 'प्रमुख' बांधवां, ऐकूं या सगळे :—

" करू श्रीगणेशा कला–रेखनाला
चला शोभवूं दालना–दालनांला
कला ठाउकी हो असे जी जयाला
तयानें करावी इथें लोल–लीला

नव्हे सांगण्याने नव्हे पढविल्यानें
नव्हे लादण्यानें नव्हे चढविल्यानें
स्वयंस्फूर्तिने रे असे काम होणे
कलावन्त ना "लाभ" ना "दाम" जाणे "

कलावन्त तो निर्मिती फक्त जाणे
म्हणो त्या कुणी वा भले वा दिवाणे !

सूत्र हें सोडूं नका
मंत्र हा मोडूं नका
संधि रे दवडूं नका
धुंदि रे सांडूं नका ॥

शिशिरीं झडे रे झडे पालवी
वसन्तीं पुन्हा ये नवी पालवी
प्रभूचीच लीला प्रभू दाखवी
नटनाटकी तो प्रभू लाघवी

परी त्यांतुनी जी झरे तत्त्वधारा
तिचा काय होई कधी लोप सारा ?
चिरंजीव जें सूत्र आहे तयांत
असूं द्या सदा आपुल्या जाणिवेंत

तरी चालवा चालवा कार्य थोर
निजानंदरूपी बना रे मयूर
ठसा हा असावा सदा अंतरीं रे
तुम्हांसारिखें भाग्य नाहीं कुणा रे !

" सजवा छत हें स्तंभ तसे हें द्वार गवाक्षहि तें
काढा चित्रें कोरा शिल्पें विविध प्रकारातें
पाहूं जिकडे तिकडे व्हावे दर्शन शिल्पांचें
पाहूं जिकडे तिकडे व्हावे दर्शन चित्रांचें

पाहूं जिकडे तिकडे व्हावे दर्शन रंगाचें
संतोषानें मानस व्हावे पुलकित रसिकांचे
नका मोकळी जागा सोडूं रंग भरा त्यांत
नयनाल्हादक बनवा सारा प्रशान्त हा प्रान्त

घडवा मढवा जडवा सजवा नटवा या " गुंफा "
पूजा ही तर त्या बुद्धाची मन प्रेमीं गुंफा
मना गुंतवा याच सुकार्यी जुंगा रे जुंगा
मोक्षपदाचा लाभ मिळविण्या मार्ग हाच सोपा "

जसा कळ्यांना फुलवी वारा घालुनि फुंकारा
'प्रमुख' त्यांतला देइ चेतना अन्य कलाकारां

ऐका ऐका सुकाव्यमय ते बोल मधुर त्यांचे
घडेल ज्यांतुनि दर्शन सुंदर प्रकल्प-रचनेचें

" थाट फुलवूं प्रति इंद्रधनुष्याचा
बहर नटवूं तेजाळ चांदण्यांचा
बाज नूतन जो सृजनशीलतेचा
नविन उभवूं संसार चित्रकलांचा

चला निर्मु या येथ लावण्यवेली
लावण्य रमणीय ज्यांचें त्रिकाळीं
अशी निर्मिती पाहिजे येथ झाली
धरूं मानसीं आंस जी हृद्य झाली

इन्द्रधनुची ती " श्रावणीं " मिरास
अन्य मासीं तो लुप्त तद्विलास
सप्तरंगचि त्यांजला नक्त फक्त
शतावधि ते गुंफांत रंग मुक्त

चांदण्या की त्या उगवतात रात्रीं
लुप्त दिवसां त्या सर्व गुप्त सूत्रीं
मात्र गुंफांतिल कोष हा सदैव
रमविण्याला हो सज्ज एकमेव

चित्रसृष्टी अंबरीं जरी फुलतें
मेघवृंदांतुनि आणि व्यक्त होते
अर्थ चित्रां त्या नसे तो कधी रे
क्षणीं अवघे ते दृश्य भंगणारे

जरी आपण ही श्रेष्ठ चित्रमाला
येथ निर्मूं तर आगळी विशाला
" एकदां का तैं हृदयिं वास केला
जन्मभरिचा तो भाग्यवन्त झाला "

अशी आकांक्षा प्रबळ असामान्य
तिच्या पूर्तीस्तव झटूं या अनन्य
निश्चयाला या नित्य धरूं हृदयीं
निश्चयानें येणार सर्व उदयीं

हें मूक कार्य आहे 'परमार्थ' यांत आहे
हें श्रेष्ठ कार्य आहे 'पुरुषार्थ' यांत आहे
सामर्थ्य यांत आहे सौंदर्य यांत आहे
हें शौर्यकार्य आहे हें धैर्यकार्य आहे
कर्तृत्व यांत आहे धन्यत्व यांत आहे
हें कलाकार्य आहे हें आयुकार्य आहे

" नव्हे रे कुणी क्षुद्र कोणीहि जन्तू
नका रे नका त्या निराशेंत गुंतू
कां शब्द हे हो 'पण' अन् 'परन्तू'?
अशानें तुटो वाटते 'ध्येय-तन्तू'
उरीं निश्चयाचा असूं द्याच बाणा
पहा आठवा की अतां 'राम-त्राणा'
विणा मानसीचा भला सर्व 'ताणा'
कलावस्त्र होईल निर्माण जाणा

" कला ठाउकी रे असोनी अम्हां ही
कुजूं काय द्यावी ? नसे योग्य तेंही
करंटे ठरू ती न उपयोजितांही
नको बोल ते उग्र पुढती कधीही "

* * *

कुविचारी खल कुणी अधम ते
असतिल आले बघण्या गंमत
आसक्तीचें कुतत्त्व भलते
बसले असतिल चघळित सांगत :-

" खावे, प्यावे, सुखी असावे
भोगयुक्त जीवन कंठावे
यथेच्छ आयुष्यांत रमावे
हवे तसे आणिक वागावे "

मरणानंतर काय लाभते ?
मरणोत्तरिचें कुणास ठावे ?
जे जें आले ते ते गेले
काय पुन्हा ते परतुनि आले ?

वेदशास्त्र अन् अखिल पुराणें
वृथा निपजलीं फसवायातें।
पुनर्जन्म तो कसला होणे ?
पाप-पुण्य तें कांहि न घडणें ! "

महाभयंकर दुष्ट लोक ते
प्रसवत होते कुविचारांतें
ढळवूं बघती तन्निष्ठेतें
रुजवूं बघती विषवल्लीतें

कलाकार परि तेथिल सगळे
रतिमात्रहि ना परन्तु ढळले।
श्रद्धा त्यांची निष्ठा त्यांचीं
अभंग होती असीम होती

ध्येयधारणा हृच्चित्ताची
अव्यभिचारी शान्त तयांची
जाण तयांना परंपरांची
रास्त भावना सुसंस्कृतीची

" कशाला फोडिता डोळे ? कशाला करहि झिजवीता ?
कशाला देह खंगविता ? कशाला जीव शिणवीता ?
काय रे त्यांतुनी लाभे ? कथा ना क्षणभरी आम्हां !
वेड की लागले तुम्हां ? म्हणावे काय स्तोमां !

कलेचा गंध नच ज्यांना असे कुणि वदति द्वेषानें
क्रोधमय हृदय हो त्यांचें बघति किती खाष्ट रोषाने !
शान्तचित्त परि कलाकार ते काय बोलले ते ऐका !
ऐकुनि फिटल्या साऱ्या शंका बोल प्रभावी ते ऐका !

" या वेडांतचि ध्येयसिद्धिचे अंकुर दडले रे
साफल्याचे समाधान तें यांतचि आहे रे
नव्हेचि साधे वेड अरे हें अद्भुत गमते रे
तुलना नच त्या अनुभूती ही ऐसे कथित रे
या कार्यास्तव जीवन वाहूं जेणें मोद मिळे
सकळांनाही आणि लाभतिल शाश्वत सौख्य-फळें "

सुवर्ण जैसे अग्नीमधुनी
झळाळुनी पडते बाहेरी
निंदा चेष्टा साऱ्या भोगुनि
कलावन्त विजयीच अंतरी

ध्येय-गर्जना त्यांची ऐका
ध्येय-दुंदुभी ऐका, ऐका
वज्रलेप निर्धार तयांचा
ऐका ऐका ऐका ऐका – ॥

" आहो मग्न सदा सुकार्य–ध्येयीं निंदा करो कुणि स्तुती
रात्रीं सूर्य नसें नभीं म्हणुनि का सोडी तयाला द्युती ?
धैर्ये अनुसरती सुमार्ग जे जे ते ईश्वरा पावती "
आहे ख्यात सनातनी वचन हें ठाऊक लोकांप्रती

धामा गाळुनिया धरोनि दृढता हें काम झालें सुरू
होतां त्यांत कसूर मात्र लवही अत्यंत पापी ठरू
ध्येयां ठरवुनिया विशाल ज्यांनीं हे कृत्य आरंभिले
आम्ही तें आतां मुळी न कधिही नच पाहिजे खंडिले

आभाळीं खुलती अनंत तारे त्यांच्यांत वसतो 'दुवा'
आहे तो तैसा म्हणोनि विश्वां जग येतसे अनुभवा
त्यागांतून उभें सुशिल येथें निष्ठमुळे अन् जगे
धागा हाच वसे म्हणोनि सारें सौंदर्य हें झगमगे

वीणा ही प्रभु दे सुभक्तिमय जी देऊं पुढीलांप्रती
ऐसे ना घडतां भवाब्धिमधुनी कैंची अम्हांतें गती ?
एकेका चित्रीं तसेच शिल्पीं सद्भाव जणुं ओतिला
" गुंफा या विलसो सदैव जगती " हा भाव की गुंफिला

जाणा तत्त्वचि हें सुजाण अपुल्या सुश्रेष्ठ धर्मातले
धारा ही स्वमनीं धरोनी दृढता हो पाहिजे जागले

ध्येयपूर्ण भाषणां ऐकुनी
हात चोळिले विरोधकांनीं
डाळ शिजेना तेथें म्हणुनी
अवघे गेले गेले निघुनी

हितचिंतक जे अंवती भंवती
शुभचिंतन ते मनांत करती
मदत कराया पुढे धांवती
कलाप्रेम उसळत ये वरती

सकौतुकें कुणि सुगुण वनिती
सुखें डुलत कुणि मुदें नाचती
निसर्गास अन् करिति विनन्ती
चला रसिकहो ! श्रवण करू ती :-

" सुमनगंधा ! जा वायुसवें तेथ
सुखास्पद तूं आमोद निर्मि तेथ
स्तब्धतामय भाग तो मुग्ध शांत
परिमळानें व्यापवी रे निवान्त "

" अरे पवना ! तूं उगा नको नाचूं
मोरपंखांसम स्पर्श करावा तूं
विनत व्हावे ज्यास्थळीं मुनी साधू
रीत ठावी तुज काय पुन्हा बोधू ? "

अन् उजेडा ! सेवेंत रहा नित्य
ज्यांत चालो बिनचूक रम्य कृत्य
नेत्र सुखवी, ते कलाकार थोर
तुझ्यावरती रे असे सर्व भार

आणि रंगांनों ! सकलही छटांनी
नटा तेथें सर्वांगयुत गुणांनीं
खरी रंगत रंगांत असे तेथें
मर्म तुमचें तें ठाउका तुम्हांते

ऐसे ऐकतां आवाहन । निसर्गें डोलाविली मान ।
" सहकार्य देऊ संपूर्ण " । मनोमनों जणुं वदलासे ।।

दिसे नभाच्या पटलावरती रात्रीं नक्षत्रांचो नक्षी
रंगयुक्त तेजाची झगमग सौन्दर्यानें सकलां लक्षी
गोलाकारी इथें वर्तुळीं जडवा, घडवा, मढवा नक्षी
कळ्या फुलांनी वा पानांनी सुबक सुबक साकारा नक्षी

काढा पक्षी, फूलपांखरें प्रकार बहु ज्यांचे
पंखावर नव रंग रंगवा चांदी सोन्याचे
तृणपात्यांचे आकारहि ते सुबक मजेदार
सूक्ष्मतरल ते स्पष्ट दिसूं द्या भाव ढंगदार

निर्भयतेचा भाव आगळा मिसळा रंग-रसीं
आणिक फिरवा रंग-कुंचले डुंबा मोद-रसीं

जे कांहीं हो आहे करणें। ते तें जीव ओतोनि करणें। यश कीर्तीचीं दिव्य किरणें। त्यांतुनि की हो फाकतील ॥ नको नको तो आळस। जेणें होई कार्यनाश। साराच सारा मुद्दलांश। नष्टप्रायचि होई पै ॥ बौद्ध धर्माचें तत्त्वज्ञान। जगी त्याचें श्रेष्ठ स्थान। ज्यास्तव बुद्धें अपुलें जीवन। जनांकारणें वेंचियले ॥ करितां ज्याचें नामस्मरण। मनन आणिक ध्येय-चिंतन। त्याहूनि तें तत्त्वाचरण। जेणें लाभते निर्वाण-पद ॥ ऐशा महापुरुषाप्रत वंदून। साष्टांग प्रणिपत घालून। समाधींत अन् ध्यानमग्न। होऊं क्षणभरी एकचित्त ॥

वासनांचा जैं नसे वास हृदयीं
निर्लेप सत्कर्मता येइ उदयी
कलाकार ते सर्व ध्येयानुगामी
सदा मग्न ते बुद्धगानांत प्रेमीं :-

" स्मरावा अहो बुद्ध कारुण्यकारी
महाशक्तिचा दूत देवावतारी
दयाप्रेम अभ्यंतरी पूर्ण नांदे
असा श्रेष्ठ तेजोनिधी सौख्यता दे ! "

" वर्षानुवर्षं चित्रें रेखाटणें। काय नव्हे हें कटाळवाणे ? "। कोणी पुसतां दुर्जन, अज्ञजनें। काय ते वदले असतिल बरे ? ॥ " अहो ! हे कार्य नसे सामान्य। ध्येयचि हें असामान्य। राहतां निरंतर कार्यमग्न। आनंद लाभे आम्हांतें ॥ काय आम्ही आरंभशूर ?। अपूर्णतेचे धनी होणार ?। पूर्णतेला हो आणूं पूर। ऐसी ख्याती करूं जगीं ॥ ऐवढें तेवढें कार्य केलें। आणि म्हणे जो " भले रे भले " !। स्वतःस तयें फसविलें। ऐसी आमुची धारणा असे। पायाचे दगड जरी म्हणूं लागती। कीं " आम्ही कशास्तव खालती ?। जाऊं केवळ कळसावरती "। मग कैसे मंदिर घडेल ते ? ॥ तेव्हां ही नसे श्रमवाहणी। ही तो सद्भाग्यनिशाणी। आम्ही असूं

समाधानी । आम्हां न स्पर्शे खेद कदा " ।। ऐशिया उत्तरें लाजले दुर्जन । केलें कलाकारां वंदन । आणिक दिधलें प्रोत्साहन । असेल घडला प्रसंग ऐसा ।।

प्रोत्साहनानें गुणाभिवृद्धि । उपदेशानें चित्त-शुद्धि ।
प्रयत्नानें लाभे सिद्धी । अनुभव हा तर स्वयंसिद्ध ।।

" चित्रोचित्रीं प्राण भरा "
ही जाण धरा, नित जाण धरा " ।। धृ ।।
शुष्क नसे हें कृत्य आपुलें
सुरस रसें पाहिजेच भरलें
सौन्दर्यानें दिसो आगळें " हेतुमानसीं हाच धरा ।। धृ ।।
ध्येय आपुलें उदात्त निर्मळ
उत्कटता ती हवीच सोज्ज्वळ
अंतःकरणीं उचंबळे मग भावुकतेचा शुद्ध झरा ।। धृ ।।
बुद्ध-जीवनीं प्रसंग नाना
सुंदर सुंदर निवडुनि घ्याना !
मानस जेणें तन्मय व्हावे चित्रांकन रंगांत करा ।। धृ ।।
शिल्पज्ञांनों ! चित्रकार हो !
स्वयंप्रज्ञ तुम्ही ज्ञाते हो !
जीवन होइल सुधन्य जेणें महत्कृत्य तें पूर्ण करा ।। धृ ।।
लाभ-लोभ ते सारे विसरुनि
कीर्ति आणि सन्मानहि सोडुनि
शाश्वत ध्येयारूढ होउनी दौड श्रेष्ठतम चला करा ।। धृ ।।
आम्रतरूला फळें लागतां
नच तो उरतो त्यांचा भोक्ता
जनांकारणें जीवन जगतां सहज लाभतो मोक्ष खरा ।। धृ ।।

"लागेल वेळ, लागो द्या । पूर्णतेसं परिपूर्णता येवो द्या । ध्येय अणुमात्र नच ढळो द्या । सांगणे नलगे तुम्हांप्रती ।। तुम्ही तर शान्ततेचे अग्रदूत । बुद्धानुयायी तपोनिष्ठ ।। कलाकोविद अन् निष्णात । निश्चय तुमचा अढळ असे ।। जो जो येथें येईल कोणी । झाला पाहिजे तुमचा ऋणी । कलादर्शीची थोर श्रेणी । पाहिजे झळकली विश्वांत" ।।

ऐसे तेजस्वी संभाषण । जागृतीचें संवाहन । करीत असेल मन उन्मन । कार्योद्युक्तचि करणारे ।। रोमरोमीं भरवी स्फूर्ती । प्रत्यक्ष घडवी कलाकृती । काय वर्णावी पामरें महती ? । जगद्वंद्य सत्कृत्य होणें जयें ।।

कलाकारांचें आचरण । पवित्र सुंदर अति पावन । बुद्धचिंतन रात्रदिन । योगसाधना साभ्यासें ।। सकल तयांचा दिनक्रम । आदर्शभूत अत्युत्तम । परमोच्च तत्त्वांचा पालन-क्रम । श्रद्धायुक्तचि उपासना ।। मनन चिंतन ध्यान धारणा । महत् तत्त्वांची निवान्त चाळणा । समवेत सुंदर संकल्पना । शिल्पचित्रांच्या सदोदित ।। नाना कथा, नाना गोष्टी । बुद्धाविषयीं श्रद्धा मोठी । सुव्यक्त अवघे करण्यासाठी । अखंड प्रयत्न करती ते ।। केलें असेल कोष्टक । कार्यासंबधी तें अचूक । त्याचाचि उतरला परिपाक । विनाखंड सुकार्य पुढें चाले ।। जेथें निरंतर चर्चा-चाळणा । आणिक सुयोग्य योजकपणा । तैसा वक्तशीर नियमितपणा । पूर्ती तेथे ध्येयांची ।।

स्वयंस्फूर्तिचा स्त्रोत कां आटवावा ?
किती काळ तो वा मनीं सांठवावा ?
तया वाट द्यारे जिणें धन्य तेणें
मनांतील कांक्षा तयें पूर्ण होणें ।।

चिताराच बुद्धाचिया सत्कथेला
किती रम्य पैलू महन् जीवनाला !
" किती चित्छटा गोड, ना जोड ज्याला "
असे बोलतां डोल येई मनाला ! ।।

"चित्र नसावे एकसुरी । चित्र नसावे कसेतरी । चित्रीं दिसावी कला चातुरी । कलाकुसरही सुंदर ती ।। अनुरूप रंग द्या चित्रांप्रती । सुख जे देतील निरंतरी । कसोटी अपुली तीच खरी । परोपरीनें सांभाळा" ।।

"शेंकडो कल्पना मानसीं आल्या । साऱ्याच का जाती व्यक्तविल्या? । प्रबल तेवढ्या येथें फुलल्या । प्रत्यय हा तर नेहमीचा ।। जी कल्पना प्रसंगाशी सुसंगत । ती व्यक्तवावी बिनदिक्कत । नीतिनियमांची मात्र संगत । सोडूं नये कदापिहि ।। असावे उदात्त वृत्तींना आवाहन । असावे साफल्य समाधान । महासुखाचें शाश्वत धन । जेणे अनायासे लाभेल ।। करोनिया यथोचित्त निरीक्षण । मानवी स्वभाव पारखून । समजून घ्यावे रे जीवन । कलेव्दारें करा आविष्कृत ।। अहो! नव्हे हे "विशिष्टांसाठी" । हें तर अवघ्या मानवांसाठी । उद्धाराची धारा मोठी । ध्यानीं मनीं असो द्यावी ।। सहज समजेल ऐसे चितारावे । तत्त्वदर्शन आणि घडवावे । प्रसंग हुबेहूब रेखाटावे । अणुमात्र हयगय नसो नसो ।।

नव्हे रे मनोरेच हे कल्पनांचे
नव्हे स्वप्न हें रे दुबळ्या मनाचें
महास्त्रोत आहेत सत्प्रेरणांचे
तयांनोच साकार हें व्हावयाचे ।।

प्रकल्प पाहिजे पूरा केला । अन्यथा जन्म व्यर्थचि गेला । त्याहून गेली वाया कला । भयाण काय नोहे हे ? ।। नको कधीही असला विकल्प । असावा वदनीं बुद्धजप । अपुलें हें जे अखंड तप । खचित जाणार सिद्धिप्रत ।।

हाव घ्यारे पूर्णतेची
धांव घ्यारे धन्यतेची
ज्यांत बीजें सफलेची
प्रकल्पाच्या पूर्णतेची

हात वदले कीं—"कर असो अनंत"
नेत्र वदले "शतगुणित होउं देत"

कुंचले तर रगले पुरे रंगीं
अंतरंगाच्या सुखदशा तरंगीं ।।

चित्त एकाग्रचि वदे असे कांहीं :-
"अशी सधी येणार पुन्हा नाहीं"
हृदय प्रेमानें भरे सर्वथैव
ध्वनी श्वसनांचा तिथें एकमेव ।।

* * *

चित्रें येथील रंगविताना । घडल्या असतील नाना घटना । परस्परांत चर्चा करतांना । पुढील प्रसंग असेल घडला ।।

कोणी रंगविसंगति पाहून । केलें असेल मार्गदर्शन । मार्मिक समूळ निरीक्षण । आविष्करण तें पुढें दिले :-

"तो रंग तसा हा रंग असा !
हृद्रंग कुठे नाहींच कसा ?
"तीन दिन तो "तरडा" देइ रंग"
नको हृदयीं तो कल्पना-तरंग

रंग कायमचा टिकावा अभंग
सकल राहूं या विचारांत दंग
रग देतांना असो बारकावा
रंग-धर्माच्या ओळखा स्वभावा

निरूपावें किति पुन्हा पुन्हा मी वा ?
कसब सारें ते इथे पणा लावा !
जीव ओतावा जधीं सत्कलेंत
तधी बेधकता रम्य येइ तींत

वैभवाचा हा सर्व कीर्तिप्रान्त
रंगयोगें होणार शोभिवन्त

वासनांचा गर्द रंग । कामनांचा सर्द रंग । विवेकाचा सौम्य रंग । नेत्रांना जो सुखवितसे ॥ भोगाहुनी त्याग श्रेष्ठ । तोहि कर्मत्याग वरिष्ठ । योग ऐसा हा बलिष्ठ । सौख्य जीवास देई महा " ॥

सकल रंगांचा केला विचार । मंथनातूनचि अमृतावतार । तैसे घडले इथें साचार । रंगसंगति मग शोभे ॥ पर्णांचा तो टवटवीतपणा । रेषांच्या स्पष्ट सुंदर खुणा । रसरसलेला मूस जाणा । तेणेंप्रमाणें रंग-चित्रें

• • •

येऊं लागले अपार जन । शिल्प-चित्रांचे घेण्या दर्शन । रंग होते ओले म्हणून । भिक्षू सांगती नम्रत्वें ॥

" रंग ओले अजुनि त्यांचे तेथ रे जाऊं नका
घेति तीं आकार चित्रें त्यां न लावा रे धका
रूप तें बिघडेल स्पर्शें रंग की होइल फिका
रसिकहो ! थांबा जरासे ! राग रे मानूं नका

जरि मुका हा भाग तो होणार पुढती बोलका
वाळतां ते रंग सारे मग करा रे कौतुका
निर्दोषता यावी तशा राहूं नये कांहीं चुका
पाहिजें सांभाळिले तंत्रास ही तर भूमिका

जणुं सुगंधी रंगधारी शेकडो सुमभालिका
सुकुनि की जातील साऱ्या स्पर्श होतां सारखा "
पाळिला आदेश त्यांचा त्या जनांनी तो निका
वाळतां ते रंग तेथें शोभल्या सुम-वल्लिका

लोटले मग रसिकजन ते ओढ जैसी चातकां
तृप्त होतां दर्शनानें नमियलें संयोजकां
ईशचरणीं लवत असतां तोष लाभे भाविकां
तोच तो संतोष तेव्हां रसिक-हृदयीं नेमका

卐 卐 卐

सुरेख सुंदर बुद्धमूर्ति । समोर घडवियली निगुती । साक्षीभूत सदैव पुढती । समोर त्याच्या कलाकर्म ॥ जणूं बुद्धाचिया चरणांवरी । अर्पियली कलेची महानगरी । प्रचंड ऐशी कामगिरी । गिरीठायीं गुरुत्व पावलीसे ॥ एकलव्यासम आराधना । धृवबाळासम ध्येयधारणा । अंबरीबापरी उपासना । केली खचित कलाकारें ॥ सातत्यानें एकाग्रमन । हृदयान्तरीं एकचि मनन । अलौकिक तत्वांचें चिंतन । प्रगाढ केले कलाकारें ॥ "तपस्येविना मिळवावे फळ" । इच्छा ऐसी अमंगळ । "श्रमतपस्येनें मिळवावे सकळ" । परम निर्मळ विचार हा ॥ जेथे सत्कार्याचा झपाटा । प्रगतीचा तेथेंच सपाटा । वैभवाचिया थाटमाटा । काय पुसावे मग तेथे ? ॥

इथें रम्यता भव्यता मूर्तिमत
कमनीयता नव्य ती शोभिवंत
जसा मेघ तो चातकां अन् मयूरां
गमे भाग हा प्रेक्षकां दिव्य सारा ॥

इथें श्रेय आहे इथें प्रेय आहे
इथें काव्य आहे सदा सौख्य आहे
कलेची भरारी मना खिळविणारी
कलेची तरारी मना डुलविणारी

कलेची उभारी मना फुलविणारी
कलेची खुमारी मना खुलविणारी
प्रतिभेची सारी । सारी कामगिरी ।
शिल्पें, चित्रें सारीं । बोलतील ॥

जिद्दीची निशाणी । ध्येयाची निशाणी ।
पूर्तीचा निशाणी । ठायीठायीं ॥

पूर्ण घडविल्यानंतर लेणी । असतिल स्फुरली कोणा गाणीं ।
उत्स्फूर्त उत्कटतेनें कोणी । असतिल म्हटली सुनिश्चित :- ॥

ध्येय-कृत्य रे आज संपलें ईप्सित अपुलें पूर्ण जाहलें ।
बंधु-भगिनिनो! आतां आपण अवभृत-स्नानाप्रती मोकळे ।। ध्रु

साहस केले सफल जाहले
कष्ट साहिले फळासि आले
आनंदाला उरे न सीमा हृदय तयाने डुले ।। धृ ।।

अवघड वाग्त होते सारे
कुणाकुणां हें वेड गमे रे
निर्धाराचें पाउल अपुलें नच कधि परि ढळले ! ।। धृ ।।

बुद्धमूर्ति ती देई स्फूर्ती
तयें घडविलो सुकार्य पूर्ती
केवळ आपण निमित्त झालो धन्य धन्य वाटले ! ।। धृ ।।

शतशतवरुषें येथ राबुनी
सुकर्म केलें पिढयान् पिढयांनीं
वंशज त्यांचे आपण म्हणुनी छाती अपुली फुले ।। धृ ।।

घाम, अश्रु अन् जीवन अर्पुन
कलाकृती निर्मियल्या आपण
कृतार्थतेचे भाव शुभंकर पहा मनीं उमलले ।। धृ ।।

व्हावें जग हें सुन्दर सुन्दर
त्याहुनि सुन्दर मानव-अंतर '
इच्छा दृढ ही येथ ओतिली फळ सुन्दर लाभलें ।। धृ ।।

हे शिल्पांनो ! हे चित्रांनों !
हे गुंफांनो ! तरुवेलींनों !
स्मरण असू द्या, भावस्पर्शानें लोचन ओलावले ।। धृ ।।

प्रत्येकानें येथें यावे
धन स्फूर्तीचें घेउनि जावे
जीवन उन्नत अन् बनवावें बुद्धासम चांगलें ।। धृ ।।

भरतवाक्य हें हीच आरती
पहा तेवते आत्मज्योती
भावभक्तिनें भरलें मानस अष्टभाव दाटले ।। धृ ।।

● ● ●

शुभद ऐशा त्या क्षणाला वायुनें संवाहिले
अन् फुलांनीं त्या क्षणां सर्वस्व अपुलें वाहिलें
सूर्यचंद्र नि तारकांनीं त्या क्षणा शुभ चिंतिलें
तेज अपुलें मुक्त हस्तें भरभरोनी अर्पिले

त्या क्षणाला कांचनाने मोतियांनीं जडविले
माणकांनी अन् हिऱ्यांनीं स्वप्रभेनें मढविले
त्या क्षणाला कस्तुरीनें चंदनानें लिंपिले
कीर्तिलागी निजसुगंधा अखिल जगतीं प्रेरिले

त्या क्षणाला अमृतानें निजसुधेनें सिंचिलें
अमरतेच्या दिव्यतेने द्रुतगतीनें बंदिले
त्या क्षणाला संस्कृतीनें आत्मभागीं स्थापिलें
त्या क्षणाला मानवाच्या हृन्मनानें वंदिलें

卐 卐 卐

अजिंठा-वैभव अवलोकितांना । मानसीं येती ज्या भावना ।
विचार आणिक त्या कल्पना । मुक्तपणें त्या निवेदितों :- ।।

मकरंदानें भरलें पोळें । सलिलें की तुडुंबले तळें । सुरंगी सुमांचे अथवा मळे । अपूर्व सुन्दर शोभतात ।। चंद्रज्योती, फुलबाजे, नळे । उडवितां दिपती अपुले डोळे । सौदामिनीचे तेज आगळे । वेगळीच दीप्ती दावितसे ।। विहंगांच्या उडत्या माळा । की मोतियांच्या सुढाळ माळा । दवांच्या किंवा बिंदुमाळा । प्रसन्नतेला बहरविती ।। संवेदनांच्या भावबळे । अंतर्यामिचि उचंबळे । गुंफा पाहतां नयनदळें । आमोदानें सुखावती ।।

विभाग. २२९
२७८६५
३।०५

प्रमाची प्रेमाची
दाटी झाली हो स्नेहाची ।
भक्तीची भक्तीची
दाटी झाली वात्सल्याची ।
शान्तीची शान्तीची
दाटी झाली आनंदाची ।
सौख्याची सौख्याची
दाटी झाली संतोषाची ।

षड्ऋतु शृंगार यांच्या वाहती चरणांवरी
क्रम असा हा सतत पाहे चाललासे निर्भरी
कां असे हे ? ठाउके का ? बुद्ध शिकवी येथुनी
या जगाला शान्तिची हो देतसे संजीवनी
म्हणुनि सृष्टी पूजितें या लेणियांना प्रतिदिनी
गिरिहि आणिक त्यांप्रता सांभाळितो रात्रंदिनी

पारिजातकांचे सुगंधी वन । करी सुमनांची पखरण ।
चंदन करा गंधित श्वसन । ठायीं ठायीं परिसरीं या ।।
वैशिष्टय हें तर अजिंठ्याचें । आणिक तेथल्या वनश्रीचें ।
नातें अतूट परस्परांचे । त्यांप्रत जडवूं या नातें ।।

* * *

कलावन्तांचा दृष्टिकोन । ज्यांत नसे मीपणाचें दर्शन ।
प्रामाणिकता सचेतन । विनम्रभावें प्रगटतसे ।।
असतां अंतर्याम निर्मळ । अभिव्यक्ति हो सहज प्रांजळ ।
त्यांतुनि उपजे रम्योज्ज्वल । सौन्दर्याचें पीक नवें ।।

प्रत्येकचि हो सुन्दर लेणी
रचूं वाटते त्यावर गाणी
गमे कुणाला येथें रमणें
कलाकृतींना परामर्शिणे ।।

किती बघावे दो नेत्रांनी ? ऐसे जाई रसिकां होउनी । मनाची पुरे अवघी धणी । आनंद होई अमर्याद ।। रसास्वादन करिता करिता । वाढे अधिकचि तद्रोचकता । उत्कंठा ती शमविता शमविता । मानस जाई गलबलुनी ।।

शिल्पचित्रदर्शन लोभसवाणे । नेत्रांलागी हे नजराणे । बघता बघतां अपुली मनें । संतुष्ट होती क्षणमात्रें ।। म्हणती–"मन हें मोठें फार । गगनाहुनिही व्यापक थोर " । परि न हा सामावे परिसर । मन हे थिटे पडे अिथें ।। ऐशी यथील श्रीमन्ती । कुबेर उणा जो धनपती । औदार्याची पेठ मोठी । लुटा लुटा रे रसिकांनो ! ।। तेजोमय तो जिवन्तपणा । टवटवणारा ताजेपणा । सारा दालनभाग देखणा । प्रसन्नतेनें फुललेला ।। नाहीं कोठे मालिन्य । नाहीं कोठे औदासीन्य । तेजोहीन वा शून्य । नाही नाही कोठेही ।। सारे कसे फुलांसारिखे । रंगमयी हृद्य नेमके । वदू किती मी अपुल्या मुखें ? । प्रत्यक्ष अनुभव अवर्णनीय ।। रत्नें, स्फटिक, संगमरवर । पाडितां पैलू शोभती सुंदर ।। तथापि जो ओबडधोवड । काळा खडबडीत पहाड । त्याप्रत सुंदर घडविणें अवघड । करणी असाधारणचि असे ।। नव्हे नव्हें हा काळा कातळ । संगमरवर वा स्फटिक नितळ । त्याहुनि वरचढ त्याचें मोल । वैशिष्टयांनीं विलसतसे ।। "संगमरवरी दगडांतून । करणें शिल्पकृति निर्माण । कौशल्य तें खचित जाण " । अभिप्राय हा सकळांचा ।। परि हो कठीण कातळांतून । मूर्ति निर्मिणें चैतन्यपूर्ण । सरस कौशल्य हें त्याहून " । मन हें म्हणण्या धजावते ।। नाहीं कोठे अल्पहि जोडणी । एकसंध ती सर्वत्र घडणी । सलग म्हणोनि दिसती देखणी । शिल्पें सुन्दर सुबक किती! ।। छिनो चालविली श्वास रोधून । नेत्रांनी साधिला असेल किरण ।

तेव्हांच चपखल ही गुंफण । निर्माण झाली रेखीवता ।। जणूं कीं हें स्वर्ण-निधान । गवसले या पर्वतीं जाण । शिल्पचित्रादि अलंकार-धन । कलाकारें सुबक घडवियलें ।।

फुटले येथे रत्नांकुर । चित्ररूपी सुन्दर सुन्दर । तयांनी भरली मनोहर । गुंफांरूपी आलयें ही ।। येथें सदैव वसन्त-बहार । जैसे सुरंगी सुमनहार । झळाळती जे अनिवार । देती नेत्रसुख अपरंपार ।।

अलंकार ते अतीव सुंदर । किती सांगूं त्यांचे प्रकार । झालासे येथून सर्वत्र प्रचार । वापर ज्यांचा ठायींठायी ।। केशभूषा वेषभूषा । डौल, अभिनय, भावभाषा । येथोनि प्रचार देशोदेशा । प्रौढी नव्हे तर वस्तुस्थिति ।।

खोदिली कोंदणे गोविली भूषणें
रत्नमाणकांची चित्ररूपी ।।
रत्नमाणके हा फक्त झळाळती
भावना फुलती परी येथें ।।
अजब या कृती ढंगदार अता
प्रस्तराच्या मूर्ती चित्रें तैशी ।।
काळेला खडक येथला हा देख
अवघा वेधक जाहलासे ।।
"इथ यारे सारे अनुभवा सुखा रे"
जणूं चित्र-तारे बोलतात ।।
रंगहि सांगती रेखाहि बोलती
साऱ्या कलाकृती एकमुखें ।।

शब्दोच्चारांविण । जरी हें भाषण । खरी मर्मखूण । पटे हृदया ।।

रंगांचा तर वाटे हेवा । पावलोपावली अवतार नवा । कराल वाहवा वाहवा । किती सांगावे प्रकार तरी ! ।। गुलाब, जाई, जुई, शेवंती । मोगरा, चाफा, अन् दुपारती । झेंडू, कर्दळी, निशिगंध फुलती । स्वरगांमध्यें अपुलाल्या ।। भिन्न भिन्न त्या रगच्छटा । खुलविती विश्वाच्या चित्रपटा । तोच अवघा येथें "साटा" । गुंफांमाजीं विलसतसे ।। जेथ पाहिजे रंग भडक । तेथें तैसा अनुरूप देख । फिकट सौम्य हवा जेथ । तैसाच तेथें दिधलेला ।। प्रसंगाचा जैसा रागरंग । काया-वसन-भूषणाचा जैसा रंग । राखोनि कलेचें मर्मांग । रंगसंगति साधियली ।। रंग पर्णांचा असतां हिरवा । कोणी रंग देतां पारवा । काय तो कोणास पटावा? । रंगभंगचि तो जाणा ।। म्हणोनि करोनि सूक्ष्म विचार । रंगाभ्यास केला थोर । अचूकपणे सविस्तर । शास्त्र हस्तगत केलें पै ।। कर्म होतां अनुभवाधिष्ठित । प्रत्यक्ष प्रत्यंतर मग येत । उत्कृष्ट निर्मिती त्यांतून होत । अतिश्रेष्ठ अन् आदर्शात्मक ।। नांव देवोनि "वास्तव" । दाविती अवघेचि अवास्तव । ऐसा कांहीं विचित्र भाव । अणुमात्रहि तो इथें नसे ।। कलेमाजी सुंदर नीती । अनुस्यूत असे मुळी ती । स्वाभाविक ही उज्ज्वल रीती । ठावी होती कलाकारां ।।

स्वार्थें लाभेना अरत्र-परत्र-लेश । स्वार्थें लाभेना अणुमात्र लभ्यांश । मूळ कार्याचाच नाश । समूळ होतो निर्धारें ।। "परमार्थ साधिता आत्मोद्धार । तरला जातो भवसागर"। ऐसा सरळ शुद्धविचार । सुजाणजन ते करितात ।। तत्त्वाचें या झाले बिंबन । म्हणोनि ऐसे फुलले बन । असो तयाप्रति नमन । मस्तक लववूं पुन्हा पुन्हा ।। लेणियांचा बहिर्भाग । कलामंडित जैशी बाग । वैभवशाली अंतर्भाग । रत्नांहूनहि रमणीय ।।

० ० ० ०

नक्षत्रांकित गगनसरोवर । की शुभ्र फेनांकित महासागर । सुविचारांकित मानवी अंतर । तैशा चित्रांकित गुंफा ।। सौन्दर्यांचे सुंदर घोंस । आदर्श चित्रांचे हे कोष । कधी कुणावर नाही रोष । दुर्लक्ष जरिहि केले

तगी ।। सर्वार्थानें अपूर्वपणा । श्रेष्ठत्व मिळालें कलागुणां । 'कलाप्रेमी' दर्शना-शिक्षणां । निरतरचि इथे येती ।। कळयांची काय हीं रूपें ? । सौंदर्याची अथवा रोपें ? । चैतन्यचि की जणूं लपे । चित्रोचित्रीं सातत्यें ।।

सामान्य आपण सारेजण । बाह्यत्वाचें आकर्षण । अंतर्यामीं सुरम्यपण । नाही पाहत नीटपणें ।। जाणोनिया हें नेमके वर्म । नेटके केलें उचित कर्म । कळोनि येईल त्यांतले मर्म । अतर्यामचि उमलतसे ।।

सुखाचे विचार      सुखाचे तुषार
सुखाचे अपार      स्रोत येथें ।।
सुखाचे आवार      सुखाचें भांडार
सुखाचेंच सार      असे येथें ।।

कौतुकाचा हा विषय । याचें सदैव तरुण वय । जैसा की रोज होई अरुणोदय । कुणी न म्हणती जुना तया ।। हा पिढ्यान् पिढ्यांची सोय । रसास्वादाचें आलय । जैसा की गिरिमलय । चंदनवृक्षें सुमंडित ।।

युगे युगे का जमेल कोणा करणे सांभाळ ?
धन्य धन्य हा पर्वत येणें केला प्रतिपाळ !
वायु - तेज - जळ - पृथ्वी आणिक साक्षी आभाळ
गिरिगर्भी ही सुरक्षित असे गुंफांची माळ !

असे नव्हे की कुणी न आले शत्रू याठायी
आले त्यांनीं शर्थचि केली, केली फोडाई !
कर्णनासिका, हस्तपाद ते समूळ छेदोनी
विनष्ट केल्या मूर्ति सुंदरा, क्रूर राक्षसांनीं !
रंग खरडुनी चित्रें केली कुरूप दैत्यांनी !
सौन्दर्याला विरूप केलें खुशाल अधमांनी !

कलाकृतींवर ओवाळावा जीव अशी महती
नष्ट दशा करण्यास जाहले सज्जधरी कुमती !

चित्रें, शिल्पें सुंदर सुंदर अमोल जो ठेवा
कलाकृती त्या रम्य मूळच्या आतां य केवा!
हात दुष्ट ते कसे न झडले, सडले नीचांचे ?
कुणीही कां नच खंडण केले त्यांच्या हस्ताचे ?

कालचक्र वा फिरलें उलटे सारे त्यावेळी ?
की देवाला त्या समयाला घोर झोप आली ?
संचित होते कांहीं म्हणुनी लाभे हे गाठी
म्हणुनि राहिले शिल्लक पाहे हे अपुल्यासाठी

पृथ्विमाल हे निधान सुंदर जगीं जया तुलनाच नसे
भारतभचें भूषण हें तर कीर्तिप्रभावें बहु विलसे
सुसस्कृतीची थोर निशाणी दृष्टिपथा येथे येते
क्रूर कचाटयातुनि ती उरली काय न अपुलें भाग्यचि ते ?

रक्षियलें पाहिजे उर्वरित जे कांहीं आहे
डोळ्यामाजी तेल घालुनी हवे दक्ष पाहे !
राष्ट्राची ही दौलत मोठी अमोल हा ठेवा
जतन करोनी पिढीस पुढल्या प्राप्त आणि व्हावा

त्याहि पिढीनें पिढ स पुढच्या तसाच तो द्यावा
असाच क्रम हा नित्यनिरंतर सदैव चालावा !

□ □ □

जेव्हां येई उत्कर्षकाल । वैभवरूपी वाढे वेल। पसरे सुकीर्ति निर्भेळ । विश्वामाजीं दिगंतरी ।। सकल क्षेत्रीं तैं समृद्धी । कलागुणांची होई वृद्धी । फोफावे भाग्य-पुण्य-निधि तुलना नोहे तयाप्रती ।। परन्तु येतां ऱ्हासकाळ । झडप घाली त्यावर काळ । होते की नव्हते काल । ऐसे करोनि सोडी तो ।। कित्येक राज्ये भारती नांदलां । कला तैसी फुलली फळली । अपकर्षकाली

लोपूं लागली । हळूहळू तीं सर्वांगें ।। त्यांतून टिकोनि जी राहिली । तीच केवळ आतां उरली । द्यावया विश्वा सुख-साउली । माउलीसमान औदार्यें ।। त्यांतल्याच या कलाकृती । किती करावी कला-स्तुती ? । सौन्दर्यकळाच ही फुलती । नांदे येथें पूर्णत्वें ।। या तर अवघ्या अद्भुत मुशी । सौन्दर्यप्रद कोष-राशी । बघतां बघतां होई खुषी । चमत्कार हा थोर असे ।। स्तंभ सुंदर अष्टकोनी । प्राचण्ड्य त्यांचे भरे मनीं । भव्यता ती अवलोकुनी । नेत्र आपुले विस्फारती ।। क्षुद्रता अवघी जावी सरोनी । भव्यता भरावी अंतःकरणीं । व्हावी हृदयीं ध्येयरोपणी । हेतु असावा सुनिश्चित ।। वृक्षा शोभे जैं वल्लरी । नक्षी तैसी स्तभावरी । लावण्यरूपी अदाकारी । बघतां मानस संतोषे ।। उंची, लांबी, रुंदी कोणी । प्रस्तराची करितां मापणी । ऐशा वेड्यालागुनी । काय म्हणावे ? नकळे मज ।। प्रमाणबद्धत्व कलाकृतींचें । वैशिष्ट्यचि तें मर्म कलेचें । लक्षण आहे जे प्रतिभेचें । पूर्णत्वानें वास करी ।।

रंगांत रमूं की सुंदर शिल्पी ? चित्रीं ?
नेत्रांत सांठवू ? अथवा हृदयीं ? गात्रीं ?
प्रतिकृती चितारूं ? वा धरु छायाचित्रीं ?
अथवा हे सारे ओवूं का हृत्सूत्रीं ?
हें चित्र अलौकिक बघतां सौंदर्याचें
मंत्रमुग्ध होवुनि मानस माझें नाचे
आनंद अनामिक सुखमय जो होताहे
शब्दबद्ध करणें दुस्तर गमते पाहे !

अरुणोदयीचे रंग कालविले । संध्यारंग वा सामाविले ? । अथवा सुमनरंग मिसळयिले । रंगमिश्रण करतांना ? ।। कल्पनेनें आस्वाद घ्यावा । आनंद पुरेपूर लुटावा । आनंद तेणें अपारजीवा । विशेषता या वास्तूची ।। काय काव्य तें केवळ शब्दी ? । छापिलें जे पुस्तकामधी ? । काव्याचा येथे विशाल अब्धी । ठायीठायीं उचंबळे ।।

काव्य हें सर्वसमावेशक । होतसे विविध कृतींतून व्यक्त । अवघें विश्व

काव्ययुक्त । अनुरक्त कोण होणार नाहीं ? ।। आंतील हे चित्र सौंदर्य । बाहेरील सृष्टिसौंदर्य । मानवा आणिक ईश्वरी काय । समोरासमोर उभे इथें ।। नृत्य असो, संगीत असो । चित्र असो वा शिल्प असो । काव्यकिरणें लागती विलसो । पाहतां त्याजला एकचित्तें ।। उभे रहा अथवा टेका । कोठेही अथवा बसा वांका । सौंदर्यदर्शनाचीया सुखा । अडथळा नाहीं कोठेंच ।। नसे कोठे आडपडदा । कलाकामाचा पारदर्शक कशिदा । ऐशिया सुंदर रसास्वादा । आगळीच हो रुची असे ।।

गवाक्षांमधोनी हवा थंड येई
तप्तान्तरां सुखविते त्याच ठायीं
सवें रम्यशा तेज-स्रोतांमधून
खुले भाग आंतिल शोभायमान ।।

टाक्यांमध्यें नीर असते उदंड
तृषा भागवीण्या न लागे विलंब
करावे किती कौतुका योजनांचे ?
तयाहूनि त्या हो अहो योजकांचे ? ।।

अंतर्भाग परम देखणा । बहिर्भाग गोजिरवाणा । अभ्यागतां वा नजराणा । नित्यनिरंतर ठेवियला ।। सुसूत्रतेचा केला कळस । सुसंगततेची अन् आरास । सुयोजकपणाच्या सूत्रास । उपमा नाहींच सर्वथा ।। विविध रंगांची रंगत । जणूं चढाओढीची पंगत । सुरेख सुबकतेची संगत । संयमपूर्वक नटलीसे ।। सुसंवाद तो ठायं ठायीं । चित्रें झळकती तेजोवलयीं । आनंदाची पाणपोई । येथ उघडली वाटतसे ।। अभिनव कल्पनांचा वर्षाव । श्रावणी सौंदर्याचा लपंडाव । अपूर्वाईचा नवलाव । झगमग झगमग लखलखतो ।। नोहे ही "घडणीच" केवळ । त्याहूनि कांहीं आगळे अंमळ । कल्पिताहून अति उज्ज्वल । भव्यदिव्य हें सौंदर्य ।।

वृक्षाचा केवळ बुंधाच पाहिला । आणि म्हणे "मी तरु देखिला"! । काय म्हणावे या पहिलेपणाला ! । पूर्णावलोकन हवे हवे ।। करिता यथाक्रम परिक्रमा । तोषे अंतर्यामीं आत्मा । आनंद वाटे पुरुषोत्तमा । म्हणोनि करावे

तेणेंपरी ।। तेणेंचि लाभे आल्हाद । मिळे अलौकिक आनंद । अनुभावितां तो आस्वाद । प्रफुल्ल होई मानस पै ।।

म्हणेल कुणि कीं "भाव हेतुचा कशास आरोपिणें !
असतिल हेतू विविध त्यामधें कशास ते तर्किणे ?
कलाकृती या पहा फक्त अन् ह्या बाजूला कसे !
मोद लाभला ! छान जाहले ! चला घरीं तर कसे ! "

रसास्वाद का पूर्ण असे हा ? सांगा मज रसिकहो !
काय तृप्तिचा लाभ तयाने ? सांगा मज रसिकहो !
सर्वांगांनीं दर्शन घेतां परम मोद होतसे
मुळापासुनी ठाव कलेचा तोषमना देतसे

नवनीतास्तव लागे करणें मंथन हे ठाउकी
मुकी कला ती मननाभ्यासें होइ खचित बोलकी !

मला वाटते सद्गुणमेळा । जमला असावा एकत्र सगळा । करोनि त्यांनीं विचार आगळा । वसती केली त्याठायीं ।। विचार त्यांचे अतिसुंदर । निववी जणूं खचित अंतर । कांहीचे ते सहजोद्गार । असतील, पुढती जे दिधले ।। लावण्य म्हणाले—"इथेच राहीन । संयमरूपें सुखें विलसेन । विनयामाजीं खुलून दिसेन । सौन्दर्याची मांदुस ही" ।। आल्हाद म्हणाला—"इथेच बसेन । प्रेक्षकांना मोद देईन ।। सुखवीन त्यांचें अंतःकरण । हृत्कोषांपरि मज लेणी" ।। बोध म्हणाला—"करीन प्रबोधन । जे जे येतील येथें जन । मूर्ती आणिक चित्रांतून । बोली अनामिक बोलेन" ।।

जे सद्गुण कल्याणकारी । ते ते नटले अभ्यंतरीं । प्रतिज्ञा जी की होती उरीं । अमरचि ठरली खरोखरी ।।

ऐसे नव्हे की येथ न कांहीं श्रृंगार । विरक्ततेचाच सारा विचार । प्रेमावाचून जग-संसार । कैसा चालेल सांगा की ? ।। मात्र इथें अतिरेकाचा

बडिवार । यथोचितपणाचीच भरभार । बीभत्सपणाचा कुविचार । अवघा अवघा विलोपला ।। असती चित्रीं प्रेमिक युगुलें । प्रेमानुनय ते रंगविले । लज्जाभाव सासिन्नले । मोहकवेधक गौरगालीं ।। प्रेमिकांचे रेखीव अवयव । उत्फुल्लतेचा वदनीं उद्भव । चित्ताकर्षक हावभाव । ठावचि घेती हृदयाचा ।। जरी ती युगलें समीप बैसली । बोलत मूक गूढ बोली । मर्यादा नोहे ओलांडिली । म्हणोनि चित्रें ही आस्वादार्ह ।। नाहीं कोठेहि अतिरेक । संयमशील भावना सुरेख । बघता वाटे अपार कौतुक । अनुल्लेख करणें योग्य नव्हे ।। शरिराचे सुबक सौष्ठव । चित्ताकर्षक मोहक भाव । मुखांवरील मुग्ध मार्दव । बघत रहावे वाटतसे ।। पहा पहा ती बाल्यदशा । जणूं उमलती पूर्वदिशा । मुग्धतेची लुब्धरेषा । निरागसतेनें खुले पहा ।। पहा पहा तो तारुण्यकाल । प्रमत्ततेचा उधळी गुलाल । शक्तिमतिचा स्रोत विलोल । जोमचि जैसा रसरसला ।। पहा आणि तें वृद्धत्व । अंगी आणी दुर्बलत्व । "हारपलें कोठे तरुणत्व ? " वांकवांकुनी धुंडितसे ।। बालिका, मुग्धा, पौढा, प्रमदा । तैशाच चित्रीं नारी वृद्धा । प्रत्येंकीच्या विभिन्न मुद्रा । एकसुरीपण नसेच की ।। जेथें अतीव सारखेपणा । वीट येई त्याचा जाणा । गोड- गोड त्या पक्वान्नां । सदैव चाखणें ओखटे ।। तैसा तोचतोचपणा । केला कलेमधून उणा । आनंदभाव झाला दुणा । शतगुणित हो सौंदर्य ।।

प्राशितां सुरुचिर मकरंद
अलिगणां अपार आनंद ।
धुमे जंव टाळांचा नाद
भक्त भजनांत होति धुंद ।
लहरतां वायुलहर मंद
होतसे मनास आल्हाद ।
अजिठा-गुंफांचा गेंद
देतसे असीम आमोद ।
जिवन्तचि जें असते कांही
उसळते त्यांतुनि नवलाई ।

गूढता गुप्तता न कांहीं
स्पष्टता प्रत्ययास येई ।
सरळता आणिक नितळाई
अनुभवा येइ सकल ठायीं ॥

एकाग्रता घडे एकान्तीं । अनुसंधान घडे एकान्तीं । ज्ञानबोधहि एकान्तीं । सुमार्गदर्शन घडे तिथें ॥ सर्वांगपरिपूर्ण घडे विचार । ठरतो प्रबळ अन् निर्धार । जे जें मानसीं ठरविले असेल । तें तें सफलत्वें घडोनि ये ॥ ऐसा एकान्ताचा महिमा । जो की सकलचि ठावा तुम्हां । प्रचीतीच्या उदाहरणां । देवोनि कशास वेळ दवडू ? ॥ पर्णांचिया त्या हालचाली । पशुपक्ष्यांच्या गूढ बोली । निर्झरांच्या तरंगावली । हुबेहुब साकार झाल्या इथें ॥

नच केवळ त्या आकृती । भावभावनांच्या अभिव्यक्ती । चैतन्याच्या अथवा सूक्ती । बोलूं बघती रसिकांप्रती ॥ जरी न कोणी समोर गेले । जावोनीहि कोणी नच बोलले । तरीहि त्यांचे चित्त डोले । स्वानंद समाधींत दंगचि ते ॥ जरी कराल कांहीं संवाद । लाभेल खचितचि आनंद । अपूर्वतेचा तो अमर्याद । आनंद भोगा सावकाश ॥ एकेका लेणीचें दर्शन । जैसे की उमलतें उपवन । बहुरंगांनी नटलें जाण । अपार सुंदर वाटतसे ॥ चांदण्यांनी अथवा गगन । झगमगे दीप्तीने जाण । तैसे लेणियांचें सुरेखपण । तेज विलसते आल्हादक ॥ हिरे, माणके, पांचू, मोती । जडविले, गणना नाही किती । तैसेच गमते मजप्रती । सुरेख येथल्या कलाकृती ॥ रत्नांनीं वा करंडक । नक्षीदार भरले सुबक । तैसे शिल्पचित्रादिक । गुंफामाजी सुंदरसे ॥ विशिष्ट योजोनि कलादृष्टी । निर्मियली प्रतिसृष्टी । अखंड करण्या आनंदवृष्टी । "अजिंक्य" कलास्थान निर्मियलें ॥ गर्द पर्णांची फुलवेली । जैसी की फुलीं फुलून आली । त्याहूनहि विशेष खुलली । चित्र, रगांनी ही लेणी ॥ अहो या भवाब्धींतून । निःसंदेहपणें तरावया जाण । कांहींतरी असावे साधन । म्हणोनि निर्मिति लेणींची ॥ जीवात्म्याची प्रगतावस्था । क्रमाक्रमानें होई तत्त्वतां । जैसी की वेल वाढता वाढता । पुष्पें फुलती योग्य कालीं ॥ जाणिवेची पूर्णावस्था । व्हावया लागी अहो

सर्वथा । प्रयत्नांची शर्थ-वार्ता । भाग्यहि सवें पाहिजे की ।। अनेकविध "योनी" फिरून । नाना जन्म घेऊन । पुण्यसंचय आणि करून । नंतर आला बुद्ध "जगीं" ।। तरीच तो झाला ज्ञानाधिकारी । मोक्षपद पावलासे निर्धारी । परोपकार परोपरी । करोनि गेला परंधामा ।। बुद्धाच्या पूर्वजन्मीच्या कथा । ज्यांना म्हणती 'जातककथा' । चरित्रें चित्रांकित तीं करितां । कलाकार असतील उचंबळले ।। ऐशिया कथांचें मर्म यथार्थ । चित्रीं झालें व्यक्त सार्थ । चित्रकारांच्या मनिचे 'आर्त' । येथे समर्थपणें दिसे ।। जगदुद्धार हा ध्येय-बाणा । यास्तव बुद्ध-जन्म जाणा । अपार प्रेम येई उधाणा । भावतरंग इथे झुलती ।। सृष्टीचें तें वसन्त वैभव । बरषीं ज्याचा एकदा उद्‌भव । मात्र येथलें शिल्पचित्र वैभव । अखंड फुलते पूर्णत्वें । अंतर्बाह्य गोमटें । कोठेच नाहीं कांहीं ओखटें । सत्यशिव सौंदर्यानें नटे । अणुरेणू तो येथील ।।

असे वाटते की मधोनीमधोनी
असावा "प्रभू" जातकी हे बघोनी
तत्तेज अतिदिव्य येथें झरोनी
गुंफांप्रती बैसले अन् जडोनी ।।

भावनांचे अंतरंग । दाविती हे सुंदर रंग । संवेदनांचे आणि तरंग । अंतर्यामीं उठतात ।। सुखोर्मींचें उधाण । सुगंधाची किंवा पखरण । हृदयीं तेंणें समाधान । परम संतोष लाभे नवा ।। कलाकरांचा पराक्रम । महान श्रेष्ठ विक्रम । माथा झुके एकदम । वंदनीय अन् कलाकृती ।।

ते बघाल जेव्हां सुरम्य नव लावण्य
निरखाल भव्यता जी न मुळी सामान्य
हृदयांत अनामिक संवेदन होईल
माधुर्य मनाला स्पर्शुनिया जाईल ।।
वनस्थली रमविण्या जैशा ठायीठायीं
त्यापरीच चित्रांची हो या नवलाई
रंगविली चित्रें सुंदरशा रंगांनीं
ते रंगचि अपुलें चित्र रंगविति रंगीं ।।

नैराश्य नष्ट करण्याप्रती । स्फूर्तिस्थानें प्रोत्साहिती । त्यांतील "अजिंठा" स्थान निश्चिती । आहे सदैव स्फूर्तिप्रद ।। "सुष्ट-दुष्टांचे घडतां संगर । सद्वृत्तीच ठर विजयकर"। तत्त्व हें सत्य निरन्तर । सुष्टचि विजयी होतो का ।। चित्राचिया माध्यमांतून । ऐसा संघर्ष दर्शवून । केले कांही दिग्दर्शन । प्रबोधनाचा हेतु असे ।। असो सदैव आनंदवृत्ती । सात्त्विक सतेज ती प्रवृत्ती । निष्कपट आणिक सद्भावना ती । रोमरोमीं भिनो सदा ।। अतर्बाहिरी समाधान । तृप्त असो अंतःकरण । जेणें सारे वातावरण । प्रफुल्लतेनें उत्फुल्ले ।। शरीर असावे निर्मळ । निरोगी आणिक मानस सबल । आला जरी साक्षात् काळ । निर्धारें अचल तें असो असो ।। पाहता चित्रे गुंफेमधली । जणु ती बोलती ऐसीच बोली । शिकवण केवढी ही चांगली । ठसते हृदयीं रम्यत्वें ।। शिल्पकला ती अभिजात । चित्रकला ती अभिजात रग कलाही तैसीच असत । ईश्वरदत्तचि त्या विद्या ।। स्फूर्तीमधुनीजी हो उपज । प्रतिभेचा तो अविष्कार सहज । हृदयंगमता आणि ओज । तेजहि तैसे फुलारते ।। कलाकृतींचे कोषागार । सुसंस्कृतीचें लेणें थोर । उदात्त जीवनाचें महाद्वार । ऐसे मजला वाटतसे ।। शिल्पचित्रांतील प्रतिमा । पूर्णत्वाच्या त्या परिसीमा । म्हणोनीचि वाटे प्रेमा । वर्णन करणे असंभव । "साधणें आहे परमोत्कर्ष । जेणें जीवन होईल कृतार्थ । आहे हा अविच्छिन्न निष्कर्ष । प्रतिमान येथले कथन करी" ।।

एकेक चित्र तें चित्ताला वेधिते
लावुनी अंतकरणा पिसें ।
त्याविना जगीं जणु कांहीं सुंदर नसे
वाटते क्षणोक्षणी की असे ।
बाहेर एवढा निसर्ग सजला असे
मनोरम शोभाही खुलतसे ।
गुंफांत निरंतर "नंदनवन" परि वसे
हृदय-मन सौख्यरसें रसरसे ।।

## – संदर्भसूचि –

### "अजिंठा" च्या अभ्यासार्थ केलेले प्रयत्न व ग्रंथ, लेख इ. चा ऋणनिर्देश


१) "अजिंठा" गुंफांचे प्रत्यक्ष दर्शन-निरीक्षण (दि. १७ फेब्रु. १९७४)

२) भारतीय संस्कृतिकोश –सं. महादेवशास्त्री जोशी (प्रथमखंड पृ. क्र. ८१ ते ८५)

३) प्राचीन भारताचा सांस्कृतिक इतिहास. ले. राहूरकर-गायधनी

४) विख्यात लेखिका व नर्तिका रोहिणी भाटे यांचा लेख.

५) Cultural Study of Ajanta –डॉ. ढवळीकर

६) अजिंठा –ले. द. वा. जोशी (जळगांव)

७) अजिंठा लेणी –मार्गदर्शिका ले. शं. बा. वाणी

८) इयत्ता तिसरीच्या पुस्तकांतील "अजिंठा" नामक धडा

९) The Vision of India–Chapter V, Section i to iv, ix, xvii by Sisikumar Mitra

१०) " Aurangabad–Daulatabad–Ellora-Ajinta " Publication Division-Ministry of India Broadcastiag, Govt. of India New Delhi 8. (1958 Oct.)

११) महाराष्ट्र शासनाच्या पर्यटन विभागानें प्रसिद्ध केलेली मार्गदर्शिका व चित्रसंच.

१२) पैस – ले. दुर्गा भागवत.

१३) Sunday Standard deted 27-7-75 मधील सचित्र लेख.

१४) "महाराष्ट्र टाईम्स" मधील श्री. राम थत्ते यांचा दि. १६-११-१९७५ चा लेख.

१५) मित्रवर्य श्री. राराविकर, पुणें यांनीं लिहिलेली टिप्पणी व 'भारद्वाज' या टोपणनावाने प्रबोधचंद्रिका जळगांव या साप्ताहिकांत दि. ७-११-१९६६ रोजी प्रसिद्ध झालेला व पुढे एकता मासिकामध्ये प्रसिद्ध झालेला लेख.

## "वेरूळमहिमान" काव्यपुस्तकावरील अभिप्राय

१. ही त्यांची सेवा त्यांना भूषणास्पद ठरेल हे खचित. न सांगताहि ते आपला प्रयत्न पुढे चालवितील नव्हे त्यांची ऊर्मिच त्यांना स्वस्थ बसू देणार नाही.

पद्मभूषण म. म. विद्यावाचस्पति डॉ. द. वा. पोतदार, पुणे.

२. आपल्या काव्यरचनेंत प्रसाद, प्रतिभा, प्रेम व प्रयत्न यांचे गोड मिश्रण झाले आहे. वेरूळचे शिल्पानें दगडांना अमर केले. त्या अमर कृतीला तुम्ही अक्षर स्वरूपांत अक्षर करून ठेवले.

डॉ. ग. श्री. खैर, M. A. Ph. D. पुणें

३. कैलास लेणें जिवन्त महाकाव्य !

वाक् विषयातीतमस्य<br>
वर्णनंनतु निश्चितम् ।<br>
वाचयित्वा वर्णनं ते<br>
लभ्यं दर्शनजं फलम् ।

सस्कृत सुभाषितकार श्री. नी. शं. नवरे, पुणें.

४. शब्दकळा अभिजात वळणाचा आणि डौलदार आहे.

पद्मश्री कविवर्य कुसुमाग्रज ऊर्फ वि. वा. शिवाडकर

५. वेरुळच्या लेण्यांवर मुग्ध होऊन रचलेली ही कवनें हृदयंगम आहेत.

महापंडित रसिकवर दा. न. शिखरे संपादक, महात्मा, पुणें.

६. 'लेणी' या विषयावर कवि 'अनिल' यांच्या 'भग्नमूर्ति' काव्यानंतर 'वेरूळमहिमान' हेंच काव्य प्रसिद्ध झालेलें दिसून येते.

कविवर्य प्राचार्य ग. ह. पाटील, पुणें यांच्या भाषणांतून

७. 'वेरूळ-वर्णन' लोहा कविवर यशवंत स्पर्शमणि झाले<br>
लाभे सुवर्णता त्या परिवेष्टन सुबक 'चोपडे' गमलें<br>
जी जन्मताच गेली भावें 'घृष्णेश्वरा' नमायाला<br>
कवितेला प्रौढपणी जगतीतल हें पुरे न मायाला ! ॥

कविवर्य श्री. खं. म. खंडागळे, गुनवडी (जि. पुणें)

८ वेरूळची लेणी अनेकांनी पाहिली असतील. त्यांतील कथाहि अनेकांनी गायल्या असतील. पण त्या लेण्यांचे महिमान आपणच पहिल्यानें शब्दांकित केले असावे असे मला वाटते.

कविवर्य ‘ कुंजविहारी ’ सोलापूर

९ आपल्या काव्यप्रतिभेचा झालेला अविष्कार मला वाचनांत बऱ्याच ठिकाणी दिसला.

कविवर्य श्री. म. भि. कुलकर्णी, पुणें

१०. आपलें हें प्रासादिक काव्य वाचून काही काळ मी स्वतः मला विसरून गेंलो. एका वेगळया वातावरणांत घरबसल्या नेण्याचे सामर्थ्य तुमच्या काव्यपंक्तीत आहे.

कविवर्य श्री. गंगाधर महाम्बरे, पुणें.

११. अनुभवलेला आनंद रसिकांच्यां ठिकाणीं संक्रमित करण्यात आपल्याला चांगले यश मिळाले आहे.

कविवर्य प्रा. डॉ. नरेश कवडी, चौगुले कॉलेज. मडगांव गोवा.

१२ वेरूळच्या दर्शनाने कोणीहि अधाच पर्युत्सुक होईल परन्तु केवळ वेरूळच्या दर्शनानें ज्याची कविवृत्ति जागी झाली, अंकुरित पल्लवित-पुष्पितफलित झाली अशा फार थोडया व्यक्ति असतील. वेरूळमहिमानाचा प्रारंभ सुन्दर रीतीनें झालेला आहे ‘प्रतिभावंतांची स्वप्नमणिमाला’ ही वेरूळच्या रूपानें डोंगरांत नटलेली आहे ही कल्पना वेरूळचें रम्य चित्र उभें करणारी आहे. त्याच्या पुढीलही वर्णन सांगोपांग तपशिलाचे व यथा-वस्तु आहे.

विख्यात साहित्यसमीक्षक प्रा. अरविंद मंगरूळकर, पुणें

१३. आपणांस देवानें ही काव्यस्फूर्ति दिली आहे. त्यांतून जितकें पीक काढता येईल तितके काढा, स्वतः आनंद भोगा व दुसऱ्यांस द्या. अशी प्रभू-चरणीं प्रार्थना.

ह. भ. प. श्री. स. के. नेऊरगांवकर माजी सिटी इंजिनियर, पुणें.

१४. 'शेतीपारख्य रुक्ष विषयांत राहूनहि आमच्या खत्यातं
एका कर्मचाऱ्यानें वेरूळ लेण्यावर काव्य रचले याबद्दल अभिमान वाटतो '

श्री. श्री. रा. चोपड B. Sc. (Agri) M S. (U. S. A)
कृषिसंचालक, महाराष्ट्र राज्य, पुणें यांचे भाषणातून—

१५ आपली काव्यशैली साधी पण प्रांजल असून त्यांत आपल्या उत्कट भावनांचा प्राकर्षानें प्रत्यय येतो. आपलें मनःपूर्वक अभिनंदन.

श्री. ल. ना. गटणे, पर्यटन संचालक, म. रा. मुंबई.

१६. शाश्वत सौंदर्यावर काव्य लिहिणें तसे कठीणच. पण प्रतिभावन्ताची झेप काही और असते. या निकषावर सदर काव्य पूर्णतया उतरते. हे कोणीही वाचक कबूल करील. मुळांतूनच वाचण्याविषयी आम्हा वाचकांस शिफारस करतो.

सम्पादक, सहकार जगत पुणें (मार्च १९७५)

१७. " I have generally seen this Book and I have liked it as your poetic expression of your artistic experience of your visit to Verul '

Prof. D. D. Wadekar, Chief Editor,
The Marathi Encyclopaedia of Philosophy, Pune

१८. पल्लवो तव काव्यप्रतिभा तोषण्या जनमानसीं
हीच सदिच्छा वसतसे मम मानसीं

डॉ. साठये, बालमटाकळी (जि. अहमदनगर)

१९. सदरील काव्यपुस्तक संस्थेतील वाचकांना आवडेल यांत शंका नाहीं काव्यप्रमी आपल्या पुस्तकाचा लाभ घेतील. दि. ३।१२।१९७४

कार्यवाह, नगरवाचन मंदिर, पुणें

२०. सर्वसामान्यांच्या बाबतींत मानवी जीवन व कला यामध्यें फारकत दिसत असली तरी हाडाच्या कलावन्ताची प्रतिभा जीवनाशी टक्कर देत देत कधी कधी साकार होते ती 'वेरूळमहिमान' या काव्याचें लेणें घेऊन ! हार्दिक अभिनंदन ! !

श्रीरामकृष्णभक्त रसिकवर श्री. त्र्यं. वा. वडूसकर, पुणें

२१. अनामिक शिल्पींनी
घडविले हें मानवतेचें
शिल्पकाव्य
कवि-वर्यांनी गाईले मुक्तपणे
मानवतेचे महाकाव्य ॥१॥
उघड हेतू दोहोतला
कीं आठवावा मनुजा
ठेवा अमोल पूर्वजांचा
करावा जतन वाढवावा
... ... संतानासाठी ॥२॥
काव्य-शिल्पींचा साधला हेतू
साधावा तसाच कविवर्यांचा हेतू
प्रार्थना हीच प्रभु-चरणी
लागोत श्रम हे कारणी
देशोद्धारिणी ॥३॥

वसन्त रघुनाथ करमरकर, पुणें

२२. या काव्याचे कवि श्री. दि. वि. कुलकर्णी हे पुण्याला गेली दोन वर्षे अस्तित्वांत असलेल्या 'काव्यशिल्प' या संस्थेंचे एक क्रियाशील सदस्य आहेत योग्य शब्द श्री. कुलकर्णी यांना सहज सुचतात. हठादाकृष्टानां... असा प्रकार त्यांना करावा लागत नाहीं. कुलगुणवती आणि पतिव्रता-- असें श्रीज्ञानदेवांनी आदर्श स्त्रीबद्दल म्हटले आहे. तेंच येथें लागू आहे. भारताच्या वैभवाचे ते शाहीरच ठरले असें म्हटले असतां ते अतिशयोक्तीचें होणार नाहीं. त्यांच्याच शब्दांत–'काव्यकलेइतुकीच काव्यगोडी। जडावी आणिक जडवून घ्यावी। काव्य ही तो केशराची पुडी। किती सांगू अनू वर्णू ? ॥ अशी रसिकांना विनंति करून श्री. कुलकर्णी यांच्या हातून अशीच सारस्वत सेवा घडो असे प्रार्थून पुरें करतो.

ह. भ. प भीमाशंकर ज्ञानेश्वर जोशी, साहित्यविशारद सेनादत्त पेठ, पुणें

२३. 'अभिनंदन' शालापत्रक, पुणें (जाने. ११७३)

२४. उत्साह, चिकाटी, आत्मविश्वास या त्रिपुटीनें जे परिश्रम केलेस ते फारच मोलाचे ठरले. वेरूळमहिमान प्रकाशन समारभाचा सोहळा पाहून मी तर स्तिमितच झालो.

श्री. वि. गं. कुलकर्णी, सेवानिवृत्त मुख्याध्यापक, बालमटाकळी (जि. नगर)

२५. 'दि. वि.' सारख्या कवीच्या सहवासांत आनंदाचे क्षण अनुभवावयास मिळतात हे खरोखरीच भाग्य.

सुरेश तांबे, M. A. M. Ed. पुणें

२६. धार्मिक पोथ्या पुराणांचा ह्या नवोदित कवीने आवर्जून अभ्यास केला असावा असे ह्या काव्यरचनेनें निःसंशय कळून येण्यासारखे आहे. काव्यांत दुर्बोध्रता कुठेंच आढळून आली नाही नाना प्रकारच्या भाववृत्तींचा फुलोरा ठिकठिकाणी फुलून आलेला दिसला. परतत्त्वाचा स्पर्श होतांच अलौकिक अशी काव्यरचना होऊं शकते. उत्तेजनार्थ धन्यवाद.

कविवर्य श्री. वि. शा. काळे (बाबुलनाथ)

२७ ईश्वरीय सौन्दर्याची गाथा गाण्याच्या कवीच्या मूळ वृत्तीतूनच भव्य अशा विषयावर छंदोरचना करण्याचा हा एक उपक्रम तयार झाला आहे. आकाशाला कवळण्यासाठी आकाशाहूनही थोरपण हवं. कवि कुलकर्णी यांच्या दोन बाहूनीच हें कवळलेपण सिद्ध केलं आहे

ओवीऐवजी गीतमाध्यमांतून ही रचना अधिक प्रभावी झाली असती. ही एक आपली सूचना. अर्थात मूळ गाभाच अतिशय मंगल आहे.

कविवर्य श्री. रवीन्द्र भट

२८ श्री. दि. वि. कुलकर्णी हे आमचे शेजारी 'वेरूळ महिमान' या त्यांच्या काव्यानें त्यांच्या प्रतिभेचा प्रत्यय आला. आतां त्यांनी 'अजिंठा' कडे आपलें लक्ष वळविले आहे यात त्यांची काव्यात्म व रसिक सौन्दर्यदृष्टिच दिसून येते त्यांना सुयश चिंतितों.

डॉ. वा. ना. कुबेर, M. A. Ph. D. पुणें

२९. श्री. कुलकर्णी हे रसिकांना आपल्या भाव-विश्वांत रमवितात. त्यांचे आगामी ' अजिठा-वैभव ' हे काव्य तर सौन्दर्य-प्रकल्प आहे. आपल्या अनुभूतीचा आनंद रसिकांना वाटून टाकण्याचं त्यांचं व्रत अभिनंदनीय आहे या कवीला उदंड काव्य स्फुरो ही सुहृदाची सदिच्छा.

श्री. द. ह. जुन्नरकर, पुणें

३०. अज्ञात भारतीय कलाकारांच्या छिन्नीतून प्रगट झालेल्या मानवांच्या शाश्वत भावनाविष्काराच्या दृश्य स्वरुपाचें एक काव्यरुप दर्शन म्हणजे वेरूळमहिमान आणि तें कवि ' दिनकर ' यांनी आपल्या प्रतिभा-प्रकाशानें घडवून काव्यरसिक मराठी मनाला दिलासा देणाऱ्या उदयोन्मुख कवि मालिकेंत आपलें एक अढळ व वैशिष्ट्यपूर्ण स्थान असल्याचें सिद्ध केलें आहे.

वि. र. गांवकर, मुख्याध्यापक म्युनि. कॉर्पो. शाळा नं. ९४ (मुलांची) पुणें.

३१. कवीनें काव्यगड हेरला व त्यानुसार ' वेरूळमहिमान ' या काव्यानें त्या गडाच्या काही पायऱ्या चढण्याचा शुभारंभहि केला. शुभेच्छा करतों की श्री. कुलकर्णी हे काव्यगडाच्या माथ्यावर आज ना उद्यां जातील.

सि. वि. संभूस, निवृत्त मुख्याध्यापक सेनादत्त पेठ. इ. क्र ३६ व पुणे.

३२. मराठवाड्याचा परिसर म्हणजे संत श्रेष्ठांचा परिसर. भक्तिसागरांत डुंबणाऱ्या या परिसरास वेरूळ व अजिंठाच्या लेण्यांनी सौंदर्यकलांची एक नवी झालर बहाल केली आहे. वेरूळच्या लेण्यांचं सौन्दर्य, विविधता, कलाविष्कार पाहून डोळयांचं पारणं फिटल्यानंतर प्राप्त झालेल्या दिव्य अनुभूतीचा साक्षात्कार म्हणजे कवि दिनकर विश्वनाथ कुलकर्णी यांचे ' वेरूळमहिमान ' हें काव्यमय वर्णन. रसिकवृंदास ती एक मेजवानीच ठरावी. सौन्दर्यकलांच्या या खाणीचं दर्शन घेण्यासाठी हजारो लोक येथें येतात अन् लेण्यांचं सौन्दर्य डोळयांत सांठवून परत जातात. व्यक्ति तितक्या प्रकृती या न्यायाबरहुकूम प्रत्येकजण आपापल्या दृष्टीनं लेण्यांकडे बघतो. कलासक्त दृष्टि लाभलेला रसिक या लेण्यांकडे श्री कुलकर्णी यांचं काव्य वाचून मात्र मोठ्या उत्कंठेने धाव घेईल. ज्यांनी ही लेणी यापूर्वीच बघितली आहेत त्यांचेसमोर तर पुन्हा ती साक्षात् उभी राहतील.

वेरूळमहिमान गायल्यानंतर 'अजिंठा-वैभव' कथन करण्याचा श्री. कुलकर्णी यांनीं संकल्प सोडला आहे. त्यांचा हा संकल्प सिद्धीस जावो ही सदिच्छा. श्री. कुलकर्णी यांची काव्यसरिता अप्रहितपणें वाहत राहून रसिक जनांना तींत डुंबण्याचा आनंद प्राप्त होवो ही सदिच्छा.

प्रल्हाद देशपांडे, पुणें

३२. वेरूळ अजिंठयाच्या लेण्या म्हणजे मूर्तिमंत काव्य. त्यावर श्री. दि. वि. कुलकर्णी यांनी शब्दकाव्याच्या सहाय्यानें उत्कृष्ट भावलेणें चढविले आहे. या लेण्यांच्या परिसरांत कविमनाला असे काही स्फुरले नाही तरच आश्चर्य. कवि कुलकर्णी यांची काव्यकलाही हे अद्भुत शिल्प आणि चित्र पाहून उमलली, विकसित झाली. तीच त्यांनी रसिकापुढे सादर केली. सहृदय काव्यरसिक त्याचा आस्वाद घेतील व श्री. कुलकर्णी यांच्या प्रतिभेचे कौतुक करतील यात शंका नाही.

स. मा. गर्गे, पुणे

REFBK-0021485
REFBK-0021485

# Testimony to a rich past

" Ever since the Ajanta frescoes were rediscovered and became generally known, they have exercised an increasing influence on our thought and on Indian art generally. They bring out not only the artistic traditions of fifteen hundred years ago or so, but make vivid the life of those distant periods. The women of Ajanta are famous. History becomes human and living and not merely a record of some distant age which we can hardly understand.

" Thus the appeal of Ajanta is not merely to the artist or the expert. but to every sensitive human being. Anyone who would understand the past of India must look at these frescoes which have exercised such a powerful influence not only in India but in distant countries also.

" If I were asked to name three or four places of paramount interest in India, which give some glimpse into India's mind in succes sive ages, I would mention Ajanta as one of them. "

Jawaharlal Nehru